पंढरी संचार

pandharisanchar.com

RNI-MAH-MAR/1499/2000

• पंढरपूर • मंगळवार, ३१ डिसेंबर २०२४ • किंमत ₹ ४ • पाने : ८ • वर्ष २९ • अंक - २२१

NO PAIDNEWS

पंढरी संचार

उद्या अंकास सुट्टी !

प्रतिवर्षीप्रमाणे ३१ डिसेंबर रोजी **'दै.पंढरी संचार'** कार्यालयास सुट्टी असल्याने उद्याचा दि. १ जानेवारी २०२५ चा अंक प्रकाशित होणार नाही, याची नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक

नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

२०२५

आमच्या असंख्य वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

At a Glance

लाकूड कापताना मशीन पायाला लागून इसम जखमी

सोलापूर : ढोराळे येथील राहत्या घरासमोर कटर मशिनने लाकूड कापत असताना ती निसटून पायाला लागल्याने इसम जखमी झाला. हा प्रकार रविवारी सकाळी १०: ३० वाजता घडला. भाऊसाहेब विष्णू देशमुख (वय ३६, रा. ढोराळे) असे जखमी झालेल्या इसमाचे नाव आहे. भाऊसाहेब यांना वैराग येथील खासगी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी भाऊ रावसाहेब देशमुख यांनी सोलापूर येथील रुग्णालयात दाखल केले आहे.

जागेच्या वादातून एकाला बेदम मारहाण

माढा : माढा तालुक्यातील बागेवाडी येथे खडी क्रेशरच्या जागेवरून तिघांनी केलेल्या मारहाणीत नागेश भैरवनाथ शिवणे (वय ३४, रा. बागेवाडी) हा इसम जखमी झाला. नागेश शिवणे याला टेंभूर्णी येथील खासगी हॉस्पिटलमधून पुढील उपचारासाठी मित्र विश्वास काळे यांनी याने सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.

मागील भांडणाच्या रागातून रिक्षा चालकाचा खून

सोलापूर : मागील किरकोळ कारणावरून झालेल्या भांडणाचा राग मनात धरून रिक्षा चालक मित्राचा खून केल्याप्रकरणी अल्पवयीन मुलासह दोघांना अटक करण्यात आली आहे. ही खुनाची घटना 28 डिसेंबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. युवराज प्रभूलिंग स्वामी (वय 20 रा. शिवगंगा नगर, शेळगी) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. निर्मल डेव्हलपर्सच्या मोकळ्या जागेत तो मृत आढळला. याप्रकरणी नागेश प्रभुलिंग स्वामी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विजयी उर्फ सोनू बनसोडे (वय 19 रा. आदर्श नगर) व एका अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबतचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

31 डिसेंबरला असणार पोलिसांचा मोठा बंदोबस्त

सोलापूर : सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नववर्षाचे स्वागत करण्यासाठी सर्वत्र 31 डिसेंबरला मोठा जल्लोष साजरा केला जातो. यानिमित्ताने मद्य प्राशन करून गाडी चालवणाऱ्यांवर पोलिसांकडून कडक कारवाई करण्यात येणार असून सोलापूर शहरातील रस्त्यांवर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह सुमारे 800 पोलिसांचा कडक बंदोबस्त राहणार आहे. यामध्ये ट्रिपल सीट मोटरसायकल चालविणे, फटाके फोडणे, मोठ्याने आरडा ओरडा करत गाडी चालवणे असे कृत्य करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे यांनी सांगितले.

2 लाख 50 हजार नागरिकांनी उभारले सौर ऊर्जा प्रकल्प

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : राज्यात विजेची टंचाई भासत असल्यामुळे केंद्र सरकारने नागरिकांना घरावर सौर ऊर्जा प्रकल्प उभा करण्यासाठी अनुदान देण्यास सुरुवात केली. यास चांगला प्रतिसाद मिळाला असून गेल्या चार वर्षात राज्यात दोन लाख 50 हजार नागरिकांनी घरावर सौर ऊर्जा प्रकल्प उभा केले आहेत. 300 युनिट पर्यंत वीज वापर करणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी व अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे. म्हणून पंतप्रधान सूर्यघर योजना सुरू करण्यात आली आहे. तसेच अनेक नागरिकांना घरावर सौर ऊर्जा प्रकल्प उभा करण्यासाठी केंद्र सरकारकडून अनुदान देण्यात येत आहे. या चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून येत आहे. सौर ऊर्जा प्रकल्पातून 2738 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. यामुळे विजेची टंचाई दूर झाली आहे. राज्यात दोन लाख 50 हजार ग्राहकांनी छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभे केले आहेत. यात ८२००० ग्राहक पंतप्रधान सूर्यघर मोफत योजनेचे आहेत. सौर ऊर्जा प्रकल्प उभा केल्याबद्दल नागरिकांना 647 कोटी रुपयाचे अनुदान देण्यात आले आहे. सौर ऊर्जा प्रकल्प वीज वितरण कंपनीमार्फत बसविण्यात येत आहे. ग्राहकाच्या घरात निर्माण झालेली ज्यादा वीज वीज वितरण कंपनी खरेदी करत आहे. यामुळे याचाही फायदा ग्राहकांना होत आहे. राज्यात चांगल्या प्रकारे सौर ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प उभे राहिले असल्यामुळे केंद्राकडून गेल्या चार वर्षात महाराष्ट्र राज्याला 260 कोटी 90 लाख रुपये प्रोत्साहन पर रक्कम देण्यात आली आहेत. शेतीला 24 तास वीज पुरवठा व्हावा म्हणून शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंप देण्यात आले आहेत. या योजनेसही शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रात सौर ऊर्जा प्रकल्प चांगल्या प्रकारे राबविण्यात येत असल्याचे दिसून येत आहे.

नोटीसा बजावूनही 35 पैकी एकानेही रक्कम भरली नाही

जिल्हा बँकेच्या भूमिकेकडे लक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : सोलापूर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेतील माजी संचालक मंडळ व अधिकारी यांनी मनमानी कारभार करून कर्जाचे वाटप केले. यामुळे बँक आर्थिक अडचणीत आली. यामुळे कर्ज घेतलेल्या 35 जणांना रक्कम भरावी अशा नोटिसा बँकेने बजावल्या आहेत. मात्र नोटीसीची मुदत संपली तरीही एकानेही थकबाकी भरली नाही. यामुळे आता बँक कोणती भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे. शेतकऱ्यांचा आर्थिक राजवाडा म्हणून सोलापूर जिल्हा बँकेकडे पाहिले जाते. मात्र जिल्हा बँकेतील संचालक मंडळांनी मनमानी कारभार करून आपल्या संस्थांना कोट्यावधी रुपयाचे कर्जाचे वाटप केले. मात्र याची वसुली करण्यात आली नाही. यामुळे बँक आर्थिक अडचणीत सापडली. यानंतर बँकेला अडचणीतून वर काढण्यासाठी शासनाने बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती केली. त्यानंतर प्रशासकाने चांगल्या प्रकारे कारभार करून बँक अडचणीतून वर काढण्याचा प्रयत्न केला. बँकेच्या माजी संचालक व अधिकारी असे 35 जणांकडे 243 कोटी 43 लाख रुपये व 12 टक्के व्याज अशी रक्कम राहिली आहे. ही रक्कम वसुलीसाठी बँकेने 35 संचालक व अधिकारी यांना नोटिसा बजावल्या आहेत. मात्र अद्याप एकानेही रक्कम भरलेली नाही. यामुळे आता बँक कोणती कारवाई करणार याकडे लक्ष लागले आहे. जिल्ह्यातील दिग्गज नेत्याकडे जिल्हा बँकेची कोट्यावधी रुपयाची थकबाकी असल्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. गोरगरीब नागरिकांनी कर्ज घेतल्यास बँक त्यांच्याकडून वसुलीचा तगादा लावून ती रक्कम वसूल करून घेते. मात्र राजकीय नेत्यांकडे कोट्यावधी रुपयाचे कर्जाची रक्कम असताना ती भरण्याकडे नेतेमंडळी दुर्लक्ष करत आहेत. यामुळे आता सहकार विभाग व जिल्हा बँक कोणती भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

माढा तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची तयारी जोमाने

खा.मोहिते-पाटील, आ.पाटील व शिंदे यांचेकडून मोर्चे बांधणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : माढा विधानसभा मतदार संघात लोकसभा व विधानसभा निवडणुकीत परिवर्तन घडले आहे. यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत परिवर्तन घडविण्यासाठी खा. धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार अभिजीत पाटील यांनी तयारी सुरू केली आहे. तर पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी माजी आमदार बबनदादा शिंदे गटाने तयारी सुरू केली असल्याचे दिसून येत आहे. यामुळे माढा तालुक्यात पुन्हा दुरंगी लढत होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे . माढा विधानसभा मतदार संघात माजी आमदार बबनदादा शिंदे यांनी आपले सुपुत्र रणजीतसिंह शिंदे यांना निवडणुकीत

अपक्ष म्हणून उभा केले होते. गेली 30 वर्ष चांगले काम केले असल्यामुळे या निवडणुकीत रणजीतसिंह विजयी होतील अशी अपेक्षा माजी आमदार बबनदादा शिंदे यांना होती. मात्र या निवडणुकीत रणजीतसिंह शिंदे यांना पराभव पत्करावा लागला. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार अभिजीत पाटील विजयी झाले. विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यामुळे शिंदे गटातील पदाधिकारी व कार्यकर्ते नाराज झाले होते. शिंदे गटात शांतता होती. मात्र दोन दिवसापूर्वी माजी आमदार बबनदादा शिंदे, माजी आमदार संजयकाका शिंदे, » पान ३ वर

तब्बल एक कोटीची बनावट दारू जप्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : नववर्षाच्या पूर्वसंध्येला पुणे विभागात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून बनावट दारू विरोधात मोठी कारवाई करण्यात आलेली पाहायला मिळत आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने पुण्यातून १ कोटीहून अधिक रुपयांची बनावट दारू जप्त केली आहे. या कारवाई एकूण 1668 बनावट मद्याच्या बॉटल्स जप्त करण्यात आल्या आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, गोवा राज्यातून बनावट दारू पुणे शहरासह गुजरातमध्ये विक्रीसाठी पाठवण्यात येणार होती.

वेळ अमावस्या निमित्त शेतात पूजन भोजनाचा घेतला आनंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : वेळ अमावस्येच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी शेतात मोरवा ठेवून शेतीचे पूजन केले. यानंतर नातेवाईक व मित्रमंडळी सह स्नेह भोजन आनंद घेतला.

भारतातील 80 टक्क्याहून अधिक नागरिक शेती व्यवसाय करतात. यामुळे शेतीला खूप महत्त्व आहे. प्रत्येक वर्षी वेळ अमावस्या दिवशी शेतात मोरवा ठेवून पूजन केले जाते. आज सोमवार वेळ अमावस्येच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी शेतात मोरवा पूजन करून शेतीची पूजा केली. यानंतर नैवेद्य दाखवून नातेवाईक व मित्र परिवारासह शेतात स्नेह भोजनाचा

आनंद घेतला. मोठ्या उत्साहात वेळ अमावस्या साजरी करण्यात आली. गेल्या वर्षी चांगला पाऊस पडला असल्यामुळे यदा खरीप हंगामातील पेरणी चांगल्या प्रकारे झाली आहे. यामुळे सर्वत्र हिरवळ दिसून येत आहे.

पंजाब ठप्प! शेतकऱ्यांच्या बंदचा मोठा फटका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

चंदीगड : विविध मागण्यांसाठी पंजाबमध्ये शेतकऱ्यांनी संप पुकारला आहे. या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून अनेक शहरातील दुकाने, बाजार बंद ठेवण्यात आल्याने रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळाला. चंदीगडसारख्या शहरात फारसा परिणाम झाला नसला तरी जालंधर, लुधियाना, पठाणकोट, मोहाली, होशियारपूर, बठिंडा सारख्या भागात बाजारपेठा बंद होत्या. रस्ते व रेल्वे स्थानकावर देखील शुकशुकाट पाहायला मिळाला.

रेल्वेने खबरदारी म्हणून सोमवारी पंजाबला ये-जा करणाऱ्या एकूण २२१ गाड्या रद्द केल्या आहेत. यातील अनेक गाड्या जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशसाठीही चालवल्या जातात. त्याचबरोबर जम्मूतवीहून यूपी, बिहारसह देशातील अनेक राज्यांमध्ये जाणाऱ्या आणि येणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्याही रद्द करण्यात आल्या आहेत. शताब्दी एक्स्प्रेस, वंदे भारत सारख्या गाड्याही रद्द करण्यात आल्या आहेत. यामुळे प्रवाशांची गैरसोय झाली आहे.

पंजाबमध्ये केवळ आपत्कालीन सेवा सुरू असून दुपार चारनंतर परिस्थिती पूर्वपदावर येण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी दुपारी चार वाजेपर्यंत बंदची घोषणा केली आहे. खासगी बसचालकांनीही संपाला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे रस्त्यांवर वर्दळ आहेत. अनेक गाड्या रद्द केल्याने रेल्वे स्थानकांवरही शांतता आहे. गेल्या अनेक दिवसांपासून उपोषणाला बसलेले शेतकरी नेते जगजितसिंग डल्लेवाल यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून हा बंद पुकारण्यात आला आहे. दल्लेवाल यांनी सरकार कडे विविध मागण्या केल्या आहेत. यात सरकारने एमएसपी कायदा आणावा ही त्यांची प्रमुख मागणी आहे. हा कायदा जो पर्यंत लागू होत नाही तो पर्यंत ते उपोषण सुरूच ठेवणार आहेत. सुप्रीम कोर्टाने पंजाब सरकारला डल्लेवाल यांच्यावर उपचार करण्याचे आदेश दिले आहेत.

विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सव्वा कोटींचे वाटप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सोलापूर : गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत मरण पावलेल्या व कायम अपंगत्व प्राप्त झालेल्या शेतकरी व त्यांच्या वारसांना सुमारे 1 कोटी 27 लाखांचे अनुदान वाटप करण्यात आले आहे. शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचुदंश, विजेचा शॉक बसणे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणांमुळे होणाऱ्या अपघातात बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू होतो किंवा काहींना अपंगत्व येते. अशा शेतकऱ्यास, त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्यायासाठी ही योजना चालू केली आहे.

वाहनांना रिफ्लेक्टर लावणे बंधनकारक

तर ऊस वाहतूक वाहन चालक, मालकावर गुन्हे दाखल होणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : ऊस वाहतूक करणारे ट्रक, ट्रॅक्टर, ट्रेलर, बैलगाडी यांना वाहनांची धडक बसून अपघाताचे प्रमाण वाढले आहे. यामुळे ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. जे वाहनचालक रिफ्लेक्टर लावणार नाहीत. त्यांच्यावर गुन्हे दाखल करा असे आदेश साखर आयुक्तांनी दिले आहेत. राज्यात 15 नोव्हेंबर पासून साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू झाला आहे. सोलापूर जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक 40 साखर कारखाने आहेत. यामुळे विविध गावातून ऊसाची तोड करून वाहनाद्वारे ऊस कारखान्याकडे आणला जातो. मात्र काही वाहनचालक वाहनांना रिफ्लेक्टर लावत

नाहीत. यामुळे अपघात होत आहेत. याची गंभीर दखल पोलिसांनी घेऊन कारखानदारांना वाहनांना रिफ्लेक्टर वाटप करावे असे सूचना केल्या होत्या. त्यानुसार साखर कारखान्यांनी वाहनांना रिफ्लेक्टर वाटप केले आहे. मात्र काही वाहनचालक वाहनांना रिफ्लेक्टर लावत नसल्याचे दिसून आले आहे. यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अपघात झाल्यानंतर ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनाने रिफ्लेक्टर लावले नसल्याचे दिसून आल्यास वाहन चालक व मालकावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश साखर आयुक्तांनी दिले आहेत. वाहनामध्ये मोठ्या प्रमाणावर ऊस भरलेला असतो. यामुळे वाहतुकीच्या नियमाचे पालन करून वाहन चालविणे गरजेचे असते. मात्र काही वाहनचालक याकडे दुर्लक्ष करून वाहन चालवितात. यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत आहे म्हणून रस्त्यावरून जाताना नागरिकांना जीव मुठीत धरून जावे लागत आहे. याची दखल पोलीस साखर आयुक्त व साखर कारखानदारांनी घेतली असून अपघात होऊ नये यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

पंढरी संचार

वाचकांसाठी सुवर्णसंधी !!!

सादर करीत आहे एक आकर्षक योजना ३९९ रु. मध्ये सहा महिने घरपोच अंक

' दै.पंढरी संचार '

आजच आपला अंक विक्रेत्यांकडे बुक करा अथवा कार्यालयाशी संपर्क साधा.

- संपर्क -

रविकिरण पाटील - ८२०८९४२३४६

दत्तात्रय बनसोडे - ९८९०९७६४७५

बुकिंग मर्यादा १५ जानेवारीपर्यंत.

मोहोळ : गेल्या सहा महिन्या पूर्वी वेगवेगळ्या ठिकाणाहून हरवलेले मोबाईल मोहोळ पोलिसांनी सायबर यंत्रणेच्या माध्यमातून शोधून मूळ मालकाला त्याची खात्री करून परत केले. त्यामुळे या नागरिकांना नववर्षाची भेट मिळाल्याचा आनंद झाला आहे. या संदर्भात मिळालेल्या माहिती नुसार, भाजी मंडई, घाईगडबड, प्रवास व खिशातून पडून मोबाईल हरवल्याच्या अनेक तक्रारी मोहोळ पोलीस ठाण्यात दाखल झाल्या होत्या. मात्र संशयित सापडत नव्हते. मोबाईल धारकांनी मोहोळ पोलीस ठाण्यात मोबाईल हरवल्या बाबत तक्रारी केल्या होत्या.

केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना भेटून निवेदन दिले

कृषी उडान विमानतळ लवकर व्हावे; आ.पाटील यांची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

माढा : माढा विधानसभाचे आमदार अभिजीत पाटील यांनी विकास कामाचा झपाटा लावलेला दिसत आहे. निवडणुकीमध्ये दिलेल्या वचनाला जागत मतदार संघातील प्रश्नांचा उलगडा करत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वीच हिवाळी अधिवेशन नागपूर येथे मतदार संघातील ५५प्रश्नांचा उलगडा करत विधानसभेच्या पटलावर नेऊन ठेवला आहे. तसेच आज दिनांक ३०डिसेंबर रोजी केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची मुंबई येथे भेट घेऊन पंढरपूर येथे केंद्रीय कृषी उडान योजना अंतर्गत विमानतळ व्हावे ही मागणी चे पत्र आमदार अभिजीत पाटील यांनी दिले.

सोलापुर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र पंढरपुराला दक्षिण काशी तर विठ्ठलाला महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणतात. विठ्ठलमंदिर अवघ्या महाराष्ट्राचे एक चिरंतन स्फूर्ती स्थान आहे. गोरगरिबांचा देव म्हणून श्री विठ्ठलाची ओळख आहे. पंढरपूरमध्ये वर्षातून चैत्री, आषाढी, माघी व कार्तिकी एकादशी निमित्त मोठ्या यात्रा भरतात..त्यातील दरवर्षी आषाढी एकादशीला लाखो भाविक येथे वारीसाठी व श्री विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. अशा या भारताची दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पंढरपूर येथे केंद्रीय 'कृषी उडान योजना २.०' या योजनेअंतर्गत विमानतळ असणे गरजेचे आहे. श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विमानतळ झाल्यास श्रीक्षेत्र शिर्डी प्रमाणे धार्मिक पर्यटन स्थळ असलेल्या पंढरपूरचाही विकास होईल. या विमान सेवेमुळे अक्कलकोट, गाणगापूर, तुळजापूर इत्यादी तीर्थक्षेत्रांना भेट देणाऱ्या

भाविकांसाठी गतिमान वाहतुकीची सुविधा उपलब्ध होईल. त्याशिवाय परदेशातील भाविकांची रिघ वाढेल, मागील काही वर्षात आषाढी वारीत परदेशी भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याने विमान सेवा सुरु झाली तर परदेशातील भाविकांसाठी सोयीचे ठरणार आहे.

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विमानतळ झाल्यास शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांपर्यंत कमी वेळात आणि कमी खर्चात पोहोचवता येईल. शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन दूरच्या बाजारपेठांपर्यंत पोहोचवण्यासाठी मदत होईल आणि त्यांचे उत्पन्नात वाढ होईल. त्याचबरोबर शेतकऱ्यांना आर्थिक लाभासह त्यांच्या उत्पादनाला जगभरात ओळख मिळेल होईल असे आमदार अभिजीत पाटील म्हणाले आहेत..

उजनीतील अवैध वाळू उपसा बंद करा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

करमाळा : करमाळा तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून उजनी जलाशय व सीना नदीतून अवैधरित्या उपसा सुरू आहे. दिवसेंदिवस या वाळू उपशाचे प्रमाण वाढत चालले आहे. हा वाळू उपसा तात्काळ बंद करावा अशी मागणी करमाळ्याचे आमदार नारायण पाटील यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे केली आहे. उजनी धरणातील लाखो ब्रास वाळू माफिया उचलत असल्यामुळे शासनाचा महसूल (रॉयल्टी) बुडत आहे. या भागात रात्रीच्या वेळेस जास्त प्रमाणात अवैध वाळुचा उपसा करुन मोठ्या प्रमाणात वाळूची तस्करी केली जात आहे.

Selected

दीड लाखाच्या गुटख्याची तब्बल ३६ पोती जप्त

बार्शी : गुटखासदृश अन्न पदार्थाचा साठा करून त्याची विक्री करण्यास बंदी असताना बार्शीत साठा केलेल्या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाने छापा टाकून १ लाख २६ हजारांचा मुद्देमाल असलेले ३६ पोते जप्त केले. वाणी प्लॉट परिसरात वाणी प्लॉट येथे २८ डिसेंबर रोजी अन्न व औषध विभागाच्या नंदिनी हिरेमठ (वय ४१) यांनी छापा टाकला. त्यांनी १६०० पाकिटे असलेली ३६ पोती जप्त केले. याबाबत गुटखा विक्री करणारे सचिन शिवाप्पा गावसाने (वय ४३, रा. वाणी प्लॉट) व अन्न पुरवठादार राम डोंबे (रा. बार्शी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

कवी संमेलनातून भारतरत्न वाजपेयी यांना अभिवादन

सोलापूर : भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त करमाळ्यातील भाजप कार्यालयात कवी संमेलन झाले. या कवी संमेलनासाठी ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश लावंड, ज्येष्ठ साहित्यिक नारायण सोरटे, लेखक भीष्माचार्य चांदणे, प्रसाद गेंड, प्रसाद कोकीळ आदी उपस्थित होते. काव्य मैफिलीच्या माध्यमातून अटलबिहारी वाजपेयी यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, भाजपचे शहराध्यक्ष जगदीश अग्रवाल, तालुका सरचिटणीस नितीन झिंजाडे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अमोल पवार आदी उपस्थित होते.

गणेश मंदिरातील दानपेटी चोरट्याकडून लंपास

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

माढा : टेंभुर्णी शहरातील नरसिंहनगर येथील गणपती मंदिरातील पैशाची दानपेटी एका अज्ञात चोरट्याने लंपास केली. चोरीची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे. टेंभुर्णी पोलीस ठाण्यात एका अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे टेंभुर्णीतील गणेश भक्तांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, टेंभुर्णी पोलिसांनी तातडीने चोरट्यास अटक करण्याची मागणी गणेश भक्तांकडून होत आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी सिकंदर मध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मोहोळ : युवासेना कार्याध्यक्ष माननीय श्री पुर्वेश प्रताप सरनाईक यांच्या वाढदिवसानिमित् युवासेना कार्यकारणी सदस्य तथा सोलापूर व माढा लोकसभा मतदार संघाच्या युवतीसेना अध्यक्षा प्रियांका अशोक परांडे यांच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वही व पेन अशा शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी श्री पूर्वेश सरनाईक यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेच्या वतीने युवतीसेना अध्यक्षा परांडे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी युवा नेते श्री विश्वास वसेकर व श्री संतोष परांडे यांचाही शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रसंगी टाकळी सिकंदर गावचे सरपंच श्री नानासाहेब सोनटक्के हे उपस्थित होते. त्यांचाही शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.याप्रसंगी शाळेतील श्री डोके गुरुजी, यादव मॅडम, गवळी मॅडम, गोडसे मॅडम व येवले मॅडम असे सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री येवले गुरुजी यांनी केले तर आभार श्री चव्हाण गुरुजी यांनी मानले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

शैक्षणिक साहित्य वाटप

पंढरी संचार छायाचित्र सेवा

मोहोळ : युवासेना कार्याध्यक्ष माननीय श्री पुर्वेश प्रताप सरनाईक यांच्या वाढदिवसानिमित् युवासेना कार्यकारणी सदस्य तथा सोलापूर व माढा लोकसभा मतदार संघाच्या युवतीसेना अध्यक्षा प्रियांका अशोक परांडे यांच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वही व पेन अशा शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

अजित पवारांसोबत कायम राहण्याचे शिंदेंचे संकेत

माढा : विधानसभा निवडणुकीत माढ्यातून माजी आमदार बबनराव शिंदे यांचे सुपुत्र रणजितसिंह शिंदे यांचा पराभव झाला. निकालाच्या महिनाभरानंतर माढा तालुक्यातील पिंपळनेरमध्ये संवाद मेळावा झाला. त्यात समर्थकांनी 'जो पक्ष विधान परिषद देईल, त्या पक्षात बबनराव शिंदे यांनी प्रवेश करावा' असा आग्रह केला. मात्र बबनदादांनी 'मी पूर्वीपासून ज्या फळीमध्ये काम करत आहे, भविष्यकाळातही त्याच फळीसोबत काम करणार आहे,' असे सांगून ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत राहण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

राऊत मस्साजोगला, देशमुख कुटुंबियांचे सांत्वन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

बार्शी : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी सांत्वनपर भेट घेतली. दिवंगत देशमुख कुटुंबीय सध्या मस्साजोग (ता. केज, जि. बीड) राहत असून ते मूळ बार्शीचे आहेत. त्यामुळे, राजेंद्र राऊत यांनी मस्साजोग गावी भेट दिली. तसेच, या हत्याप्रकरणाची माहिती घेत देशमुख कुटुंबाचे सांत्वन केले. दरम्यान, काही दिवसांपूर्वी बार्शीत संतोष देशमुख यांच्या आरोपींना अटक करण्याची मागणी करत बार्शीकरांनी मोर्चा देखील काढला होता. जोपर्यंत संतोष देशमुख यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत आपण देशमुख कुटुंबियांच्या पाठीशी आहोत असेही राजेंद्र दाऊत यांनी सांगितले.

पावणे सहा लाखांचा ऐवज मिळाला परत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

कुर्डूवाडी : कर्तव्य आटोपून रेल्वेने घराकडे निघालेल्या कुर्डुवाडी लोहमार्ग पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार दुर्योधन गुलाब कांबळे यांनी महत्त्वाची कामगिरी केली. रेल्वेतील प्रवासी महिलेचा सुमारे सहा लाखांचा ऐवज असलेली पर्स चोरून नेणाऱ्या दोन चोरट्यांना मुद्देमालासह मोठ्या शिताफीने पकडले. ही घटना शनिवारी (दि. २८) मुंबई-चेन्नई एक्सप्रेसमध्ये बाळे रेल्वे स्टेशन येथे घडली. या कामगिरीमुळे दुर्योधन कांबळे यांचे कौतुक होत आहे.

अनुदानासाठी 40 शेतकऱ्यांचे प्रस्ताव दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सोलापूर : पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्यावतीने ज्या शेतकऱ्यांकडे पशुधन व दुधाळ पशुधन असणाऱ्या अशा शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेच्या शेष फंडातून पशुसंवर्धन विभागाच्या वतीने मुरघास बॅग व खनिज मिश्रणासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येते. त्यासाठी कारंबा गावातील 40 शेतकऱ्यांचे प्रस्ताव उत्तर सोलापूर पंचायत समिती पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. सुदेश अभिवंत, डॉ. जाधव यांच्याकडे देण्यात आले. यामुळे पशुधन व दुधाळ पशुधन असणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान मिळाल्यास त्या शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे.

सोलापूर विद्यापीठात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

सोलापूर : महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात दि. 1 ते 15 जानेवारी 2025 या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत विद्यापीठांमध्ये तसेच संलग्नित महाविद्यालयांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागावी. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती कुलसचिव योगिनी घारे यांनी दिली. या अभियानांतर्गत पुस्तकांचे सामूहिक वाचन, ग्रंथ प्रदर्शन इत्यादी उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

शेतकऱ्यांना रब्बीसाठी उजनीतून पाण्याची पाळी द्यावी

करमाळा : करमाळा मतदार संघातील शेतकऱ्यांना रब्बी आवर्तनाद्वारे शेतीसाठी उजनीतून पाण्याची पाळी देण्यात यावी, अशी मागणी आमदार नारायण (आबा) पाटील यांनी केली आहे. यासाठी त्यांनी कार्यकारी संचालक (कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे) यांना निवेदन दिले आहे. दहिगाव उपसा सिंचन योजना व सीना भीमा जोडकालवा यामधून रब्बी आवर्तन देण्यासाठी संबंधित विभागास तातडीने आदेश दिले जावेत.

गीर गाईचे शुद्ध दूध मिळेल. त्वरित संपर्क साधा

आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

शिवणे तालुका सांगोला येथील घटना

2 लाख 30 हजार रुपयांवर अज्ञात चोरट्याने मारला डल्ला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सांगोला : बंद घरात प्रवेश करून अज्ञात चोरट्याने सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण 2 लाख 30 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेल्याची घटना शनिवार 28 रोजी रात्री 10.30 ते रविवार 29 रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याबाबत गणेश दिलीप बनसोडे रा.शिवणे यांनी सांगोला पोलीसात फिर्याद दिली आहे.

याबाबत सांगोला पोलीस स्टेशनकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, शनिवार दि.28 रोजी रात्री 10.30 वा. चे सुमारास घरातील एका खोलीत फिर्यादी हे कुटुंबासोबत झोपले होतो. रविवार दि.29 रोजी पहाटे 3 वा. चे सुमारास फिर्यादी हे लघुशंके करीता उठुन घराच्या बाहेर येत असताना घराचे दाराची कड़ी कोणीतरी बाहेरून लावली होती. म्हणून फिर्यादी यांनी चुलत भाऊ विजय बनसोडे यांना फोन करून कोणीतरी बाहेरून कडी लावली आहे. असे म्हणून कडी उघडण्यास सांगितले

त्यानंतर भाऊ विजय यांनी दरवाजाची कडी काढून फिर्यादी बाहेर आले असता त्यांच्या घराच्या बाजूस असलेल्या दोन खोल्यांच्या दाराची कुलपे तुटुन खाली पडले होती. फिर्यादीची आई गावी गेली असल्यामुळे त्या दोन्ही खोल्यांना लावलेले कुलुप कोणीतरी तोडले होते. तेव्हा फिर्यादी हे कुलुप तोडलेल्या खोलीत जाऊन कपाटा जवळ गेले असता लोखंडी कपाटाच्या समोर कपटातील कपडे व सामान अस्थावेस्थ पडले होते. त्यातच फिर्यादी यांनी स्वतःचे व पत्नीचे दागिने ठेवले होते. यामध्ये चोरट्यांनी 60 हजार रूपये किंमतीच्या दोन सोन्याच्या जेन्टस चैन, 75 हजार रुपये किंमतीच्या तीन सोन्याच्या पिळ्याच्या अंगठ्या, 10 हजार किंमतीचे कानातील फुलेजुबे, 3 हजार रुपये किंमतीचे चादिचे पैंजन व हातातील चांदीचे कडे, 6 हजार रुपये किमंतीची सोन्याची अंगठी व बाली, 75 हजार रुपये किंमतीच्या 500 रूपये दराच्या 150 चलनी नोटा व 1 हजार रूपये एक हातातील घड्याळ असा एकूण 2 लाख 30 हजार रुपयांचा मुद्देमाल असा समावेश आहे. त्याचा शोध घेतला असता ते दिसले नाहीत. तसेच गावातील मच्छिंद्र वैभव बंडगर यांचेही घर चोरांनी फोडून त्यांचे घरातील काही दागिने व रोख रक्कम चोरून नेली आहे अशी माहिती मिळालेली असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याबाबत सांगोला पोलिसात फिर्याद दिली असून पुढील घटनेचा तपास सांगोला पोलीस करीत आहेत.

पंढरी संचार

सोलापूर : नववर्षात किती सुट्ट्या याची उत्सुकता सर्वांना असते. यंदा 2025 मध्ये गुढीपाडवा, रामनवमी, मोहरम आणि प्रजासत्ताक दिन यांसारखे सण रविवारी येणार आहेत. अशात राज्य सरकारने पुढील वर्षीच्या सुट्ट्यांची यादी जाहीर केली आहे. महाराष्ट्र सरकारने 24 सार्वजनिक सुट्ट्यांव्यतिरिक्त 23 ऑक्टोबर 2025 भाऊबीज, ही पुढील संस्थांसाठी अतिरिक्त सुट्टी म्हणून घोषित केली आहे. यावर्षी एकूण 52 रविवार आहेत. तसेच, दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारच्या स्वरूपात 26 शनिवार सुट्ट्या असतील. सार्वजनिक सुट्ट्यांमुळे बँका बंद राहतील.

एमएएच- एलएलबी- सीईटी-२०२५ करिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू

दि.२७ जानेवारी पर्यंत ऑनलाईन फॉर्म भरण्याची मुदत

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पदवीनंतर ३ वर्षे कालावधी असलेल्या एलएलबी ला प्रवेश घेण्याकरिता प्रवेशपूर्व परीक्षा देणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने सदर प्रवेशपूर्व परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्या असून एमएएच-एलएलबी-सीईटी- २०२५ या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची प्रक्रिया शुक्रवार, दि.२७ डिसेंबर २०२४ पासून ते सोमवार, दि.२७ जानेवारी २०२५ पर्यंत सुरु राहणार आहे. पदवी उत्तीर्ण झालेल्या व पदवीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एमएएच-एलएलबी-सीईटी २०२५ साठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरीमध्ये उपलब्ध केली आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली.

कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण असलेले जे विद्यार्थी एलएलबी ला प्रवेश घेऊ इच्छितात त्यांना शासनाची एमएएच-एलएलबी-सीईटी-२०२५ ही परीक्षा द्यावी लागेल. महाराष्ट्र शासनाने घोषित केल्यानुसार दि. २० मार्च २०२५ व दि. २१ मार्च २०२५ या दोन दिवशी सदर परीक्षा होणार आहे. या परीक्षेसाठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया शुक्रवार, दि.२७ डिसेंबर २०२४ पासून ते सोमवार, दि.२७ जानेवारी २०२५ पर्यंत चालणार आहे. खुल्या प्रवर्गासाठी प्रवेश परीक्षा नोंदणी शुल्क रु.१०००/- व अनुसूचित जाती-जमातीसाठी रु.८००/- एवढे असून हे नोंदणी शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. या सीईटी परीक्षांचे फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांकडे आयडेंटी साईज एक रंगीत फोटो, एटीएम कार्ड अथवा ऑनलाईन बँकिंगचा लॉगीन आयडी आणि त्याचा पासवर्ड या बाबी आवश्यक असणार आहेत. या प्रवेश परीक्षेच्या संदर्भात अधिक माहीतीसाठी शासनाचे अधिकृत www.mahacet.org हे संकेतस्थळ पाहवे तसेच स्वेरी अभियांत्रिकीच्या प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील (मोबा. नंबर-९५९५९२१९५४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

सिंचन योजनेच्या कालव्याला भगदाड, पडलं की पाडलं?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

बार्शी : बार्शी तालुक्यासाठी वरदायिनी असलेल्या बार्शी उपसा योजनेतून कालव्याच्या माध्यमातून दरवर्षी पाणी सोडण्यात येत. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी उन्हाळ्यात होणारी पाणी टंचाई आणि पिकाच्या पाण्याचा प्रश्न काहीअंशी मार्गी लागतो, तर शेकडो हेक्टर जमीन ओलिताखाली येते. मात्र, येथील कालव्याला कुणीतरी भगदाड पाडल्याचे दिसून येते. त्यामुळे, हे भगदाड पाडून पाणी पळवण्याचे काम तर होत नाही ना, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

» पान १ वरुन

माढा तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्था...

रणजितसिंह शिंदे यांनी आपल्या गटाची बैठक घेतली. या बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी पराभव झाला म्हणून नाराज होऊ नये. लवकरच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीत संपूर्ण ताकदीने उतरून पुन्हा सत्ता आणण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन माजी आमदार बबनदादा शिंदे यांनी केले आहे. यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक शिंदे गट पूर्ण ताकदीनिशी उतरणार असल्याचे दिसून येत आहेत. तर टेंभुर्णी येथे नूतन आमदार अभिजीत पाटील यांचा नागरिक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. धैर्यशील मोहिते पाटील होते. खा. मोहिते पाटील यांनी यावेळी सांगितले, माढा लोकसभा व विधानसभा मतदार संघात परिवर्तन घडले आहे. त्याचप्रमाणे आता माढा तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत परिवर्तन घडविण्यासाठी मी व आमदार अभिजीत पाटील, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीला पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी लागावे असे आवाहन केले. एकंदरीत माढा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत आमदार बबनदादा शिंदे गटाविरुद्ध खासदार धैर्यशील मोहिते पाटील व आमदार अभिजीत पाटील मैदानात उतरणार आहेत. यामुळे पुन्हा दुरंगी लढत होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत उमेदवारी मिळावी म्हणून अनेकांनी प्रयत्न सुरू केले असल्याचे दिसून येत आहे.

ग्रीन फिंगर्स कॉलेज तर्फे स्कूल कनेक्ट कार्यक्रमाचे आयोजन

माळशिरस : -ग्रीन फिंगर्स कॉलेज तर्फे स्कूल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक प्रभावी करिअर मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली गेली आजच्या जलद विकसित जगात पारंपारिक करिअर मार्ग हाच एकमेव पर्याय राहिलेला नाही आर्टिफिशल इंटलिजन्स डिजिटल मार्केटिंग ग्राफिक्स डिझाईन या क्षेत्रातील करियर फायदेशीर म्हणून उदयास आले आहेत याची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यशाळेत नवीन करिअरच्या संधी व त्यामध्ये येणारे नवीन नवीन सॉफ्टवेअर मधील बदल तसेच करिअरमधील आवश्यक कौशल्याची माहिती देण्यात आली या कार्यशाळेत अशा व्यक्तींची उदाहरणे देण्यात आली ज्यांनी नवीन काळातील करिअरमध्ये प्रवेश केलेला आहे . या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चौकटी बाहेर विचार करण्यास प्रेरित केले गेले . ही कार्यशाळा माळशिरस ,अकलूज , नरसिंगपूर , टेंभुर्णी इत्यादी अनेक गावातील विविध महाविद्यालयांमध्ये संपन्न करण्यात आली . या कार्यशाळेमध्ये नवीन शैक्षणिक धोरण व त्यामधील बदल याची माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक व नवीन तंत्रज्ञानानुसार असणाऱ्या करिअर संधी विषयी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते .

» Selected

भाजप व मित्रपक्ष एकत्र निवडणूक लढविणार

सोलापूर : भारतीय जनता पार्टीची सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आगामी निवडणुकीसंदर्भात विचारविनिमय बैठक पार पडली. यावेळी शेतकऱ्यांच्या हक्काची आणि सोलापूरची सर्वात मोठी बाजार समिती म्हणून ओळख असलेल्या या निवडणुकीत भाजप व मित्रपक्षांनी एकत्र येऊन निवडणूक लढवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. यावेळी आमदारसुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, मनीष देशमुख, रामप्पा चिवडशेट्टी, संगप्पा केरके, राम जाधव, हणमंत कुलकर्णी, डॉ. चनगोंडा हवीनाळे, शिरीष पाटील, अण्णाराव बाराचारे उपस्थित होते.

भाजपा सदस्य नोंदणी अभियानाची कार्यशाळा संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सोलापूर : दक्षिण सोलापूर मतदारसंघातील जगदीशश्री मंगल कार्यालय येथे भारतीय जनता पार्टीच्या सदस्य नोंदणी अभियानाची कार्यशाळा पार पडली. यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी उपस्थित सर्व सदस्यांशी व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. भारतीय जनता पक्षाची सदस्यता नोंदणी कशी करावी आणि ही सदस्य नोंदणी आपल्याला जास्तीत जास्त प्रमाणात कशी करता येईल, यावर सर्व कार्यकर्त्यांना सूचना दिल्या. यावेळी संगप्पा करके, राम जाधव, हणमंत कुलकर्णी, रामप्पा चिवडाशेट्टी, मनीष देशमुख, आनंद बिराजदार, अर्जुन जाधव, शिवराज सरतापे आदी उपस्थित होते.

सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा

पंढरपूर : आमदार अभिजीत आबा पाटील यांचा श्री विठ्ठल कारखान्याचे वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आ. अभिजीत पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास साखर कारखान्याचे सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उजनी - सोलापूर जलवाहिनीचे काम मार्गी लावणार

सोलापूर : सोलापूर शहरातील भारतीय जनता पार्टीचे तीनही आमदार मिळून आम्ही उजनी- सोलापूर दुहेरी जलवाहिनी आणि सोलापुरातील बी 2 च्या चाळीचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आश्वासन सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापुरात झालेल्या एका कार्यक्रमात दिले. यावेळी माजी उपमहापौर दिलीप कोल्हे आदी उपस्थित होते.

ई.के.वाय.सी. शिबिराचे यशस्वी आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : शासन नियम अन्वये ऑनलाईन पात्र रेशन कार्ड ची इ के वाय सी करणे अनिवार्य आहे. मयत व्यक्तीचे धान्य कोटा कमी होणार आहे . तसेच ज्या व्यक्ती ई के वाय सी पूर्ण करतील त्यांनाच यापुढे प्रमाणित धान्य दिले जाणार आहे.

गणेश सहकारी ग्राहक संस्था ,एकनाथ भवन समोर येथील शासन मान्य स्वस्त धान्य दुकानात आज ई के वाय सी शिबीर आयोजित करण्यात आले होते. 5 पॉस मशिन द्वारे आज 500 पेक्षा जास्त व्यक्तीचे अंगठे घेऊन या शिबिराची रात्री उशिरा सांगता करण्यात आली. सदर प्रसंगी पुरवठा निरीक्षक श्री.कुंभार यांनी अचानक भेट देत , ई के वाय सी , धान्य वाटप टक्केवारी याचा आढावा घेतला व मार्गदर्शक सूचना केल्या. तसेच नगरसेवक शैलेश बडवे हे स्वतः थांबून कार्ड धारकांना ई के वाय सी साठी प्रोत्साहन देत होते.

सदर शिबिराचे आयोजन स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष सुनील (अण्णा) पेंटर , जिल्हा संपर्क प्रमुख नितीन (अण्णा) पेंटर यांच्या नेतृत्वाखाली केले होते. यावेळी संघटनेचे पदाधिकारी श्री. दत्ता चव्हाण , श्री.संजू पवार , श्री. प्रज्वल सुगंधी , श्री. सागर जाधव ह्या धान्य दुकानदार बांधवांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

नगरपालिकेकडून निकृष्ट काम; नागरिकांची तक्रार

करमाळा-नगरपालिकेकडून निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. निकृष्ट कामामुळे कृष्णाजी नगर भागात दोन ठिकाणी गटारीचे बांधकाम करूनही नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. कृष्णाजीनगरच्या प्रवेशद्वारात (येडा आई मंदिरासमोर) काही दिवसांपूर्वी नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी बांधकाम केले होते.

आ. देशमुख यांनी घेतला हुरड्याचा आस्वाद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील अकोले मंद्रूप येथे हुरडा पार्टी व स्नेहसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी सर्व उपस्थितांशी स्नेहसंवाद साधला. यामध्ये एक गाव एक उत्पादनासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन गावाच्या विकासासाठी हातभार लावावा, असे आवाहन केले. त्याचप्रमाणे गेल्या दहा वर्षापासून दक्षिण सोलापूरमध्ये जी विकासकामे चालू आहेत. त्यामुळे तालुक्याचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली आहे. प्रत्येक गावाची ओळख निर्माण व्हावी, यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू असे आश्वासन गावकऱ्यांना दिले.

रस्त्याची साईटपट्टी खोदल्याने धोक्याची शक्यता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

करमाळा : साधारण महिन्यापूर्वीच जेऊर- चिखलठाण रस्त्याचे डांबरीकरण झाले. हा रस्ता खराब झाला तर पुन्हा मागचे दिवस येणार असल्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. करमाळा तालुक्यातील जेऊर- चिखलठाण रस्त्याचे काम अनेक वर्षापासून रखडले होते. या रस्त्यावर खड्डे पडल्याने नागरिकांना वाहने चालवणे अवघड झाले होते. या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी आंदोलने झाली होती. माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी यामध्ये लक्ष घालून निधी उपलब्ध करत रस्ता करून घेतला होता. महिन्यापूर्वी या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाले आहे.

सोलापूरच्या वंगारी यांची फिल्म आज डिसेंबरला प्रसारित होणार



माळशिरस : सध्याच्या आधुनिक जीवनशैलीच्या युगात छोट्या छोट्या कारणावरून नैराश्याने ग्रासणाऱ्या युवा पिढीला सकारात्मक राहण्याचा संदेश देणारी हिंदी व तेलुगू भाषेतील 'कॉंशियसनेस' ही शॉर्ट फिल्म दि. आज 31 डिसेंबर रोजी यूट्यूबवर प्रसारित होणार आहे, अशी माहिती सोलापूरचे कथा-पटकथा-संवादलेखक, निर्माता व दिग्दर्शक रविराज वंगारी यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. वात्सल्य प्रोडक्शन्स या बॅनरखाली या शॉर्ट फिल्मची निर्मिती करण्यात आली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत

मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांची कार्यशाळा संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत सुरू केलेल्या संगणकीय धोरणानुसार विकसीत सप्लाय चेन मॅनेजमेंट आज्ञावलीमधील रिटेलर मॅनेजमेंट सिस्टीम या मॉडयुलवरील विषयाबाबतची सीएल-3, एफएल-2, एफएल/बीआर-2, एफएल-3 अनुज्ञप्तीधारकांकरीता एकदिवसीय कार्यशाळा पंढरपूर विभागामार्फत आयोजित करण्यात आलेली होती.

या कार्यशाळेचे आयोजन पार्वती ताड औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खोमनाळ नाका, मंगळवेढा येथे करण्यात आले होते. सदर कार्यशाळा राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी, अपर आयुक्त यतिन सावंत, , सहआयुक्त (प्रशासन),एस.एन.चव्हाण, सहआयुक्त (मळी/मद्यार्क)व्ही. जी.इंदिसे, सहआयुक्त (अंमलबजावणी व दक्षता) पी.पी. सुर्वे, विभागीय उपआयुक्त सागर धोमकर, पुणे विभाग, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक भाग्यश्री जाधव, उपअधीक्षक एस.आर.पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेमध्ये सप्लाय चेन मॅनेजमेंट मधील रिटेलर मॅनेजमेंट सिस्टीमचे संचालन प्रभावीपणे होण्याकरीता अनुज्ञप्तीधारकांना पंढरपूर विभागाचे निरीक्षक पंकज कुंभार, दुय्यम निरीक्षक बापू चव्हाण पंढरपूर यांनी सखोल मार्गदर्शन केले तसेच याबाबत समस्यांचे निराकरण केले.

यावेळी मंगळवेढा, सांगोला व पंढरपूर तालुक्यातील अनुज्ञप्तीधारक उपस्थित होते.

तसेच सदर कार्यशाळा आयोजित करण्यासाठी राहुल ताड यांचे बहुमोल तांत्रिक सहकार्य लाभले. तसेच विभागाचे श्री. गुरूदत्त भंडारे, सदुनि, जवान सर्वश्री. विजयकुमार शेळके हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन जवान विनायक वाळुजकर यांनी केले.

पंढरी संचार

हक्काची जागा

देशातील नागरिकांच्या मालमत्तांना अधिकृत चेहरा देणाऱ्या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'स्वामित्व' योजनेचा शुभारंभ नुकताच ३० जिल्ह्यांत झाला. राज्यातील ग्रामीण भागात वाड्या-पाड्यांवर, खेड्यांमध्ये मूळ गावठाणात वाडवडिलोपार्जित जमिनीवर स्थायिक असलेल्यांना आता त्यांच्या जमिनीची मालकी अर्थात स्वामित्व मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही महत्त्वपूर्ण 'स्वामित्व' योजना जाहीर केली असून, या योजनेच्या माध्यमातून राज्यातील ३० जिल्ह्यांतील ३० हजार ५१५ गावांतील मालमत्ताधारकांना 'डिजिटल प्रॉपर्टी कार्ड' मिळणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना 'प्रॉपर्टी कार्ड' मिळण्याबरोबरच शेतकऱ्यांची आर्थिक पत सुधारण्यासाठी या योजनेचा फायदा होणार आहे. 'प्रॉपर्टी कार्ड' मिळाल्याने शेतकऱ्यांना मालमत्ता कर सुलभरीत्या भरता येणार असून बँकेतून विविध प्रकारची कर्जे मिळविण्यासाठी तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या अनेक कल्याणकारी योजनांचा लाभ मिळविण्यासाठी प्रॉपर्टी कार्डची मोठी मदत होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळ सदस्यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यातील ३० जिल्ह्यांच्या ठिकाणी हा शुभारंभ कार्यक्रम होणार आहे. पंतप्रधान मोदी दूरदृश्य प्रणालीद्वारे या स्वामित्व अर्थात मालमत्ता कार्डाच्या महावाटप शुभारंभास मार्गदर्शन करणार आहेत. या योजनेमुळे गावपातळीवरील नकाशे उपलब्ध होणार असून, ग्रामीण भागातील मालमत्तेबाबत स्पष्टता येणार आहे. वर्षानुवर्षांपासून मालमत्तेसंबंधी असणारे वाद मिटवण्यासाठी या योजनेची मदत होणार आहे. पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पनेतून ही योजना तयार करण्यात आली आहे. गावकऱ्यांना त्यांच्या जमिनीवर हक्क मिळवून देणे हा त्याचा उद्देश आहे. भटक्या-विमुक्तांपासून सुरुवात करून सर्व घटकांना त्याचा लाभ मिळावा हा उद्देश आहे. प्रॉपर्टी कार्ड मिळाल्यानंतर गावक-यांना जमिनीवर गृहकर्ज घेता येणार आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा लाभ सहज मिळेल, आर्थिक बळ मिळेल आणि गावे स्वयंपूर्ण होतील. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील मालमत्तांचे ड्रोन आधारित सर्वेक्षण होणार असल्याने नागरिकांना आपल्या मालमत्तेचे डिजिटल प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध होणार आहे. ग्रामीण भागात वडिलोपार्जित मालमत्तेची कागदपत्रे नसल्यामुळे अनेकदा मालमत्तेवर कब्जा केला जातो. यातूनच शेतकऱ्यांची फसवणूक होण्यासारख्या घटना घडतात. शेतकऱ्यांना डिजिटल प्रॉपर्टी कार्ड मिळाल्यामुळे अशा सर्व गोष्टींना आळा बसू शकतो. ग्रामीण भागातील नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड मिळण्याबरोबरच शेतकऱ्यांची आर्थिक पत सुधारण्यासाठीही या योजनेचा फायदा होणार आहे. या योजनेच्या माध्यमातून ग्रामपंचायती स्वयंपूर्ण होण्यास मदत होणार आहे. या योजनेमुळे गावातील जमिनीचे योग्य प्रकारे वाटप झाल्याने ग्रामपंचायतींना कर आकारणी सुलभरीत्या करता येईल. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ होईल परिणामी ग्रामपंचायती स्वयंपूर्ण होतील, गावातील विकासकामांना गती मिळेल. आदिवासी भागात नागरिकांकडे पिढ्यांपिढ्या जमिनीच्या मालकीची कागदपत्रे नसतात. त्यामुळे आदिवासी भागातील नागरिकांना कायमस्वरूपी मालमत्ता कार्ड मिळण्यासाठी ही योजना फायदेशीर ठरणार आहे. जमीन मोजणीच्यावेळी ग्रामसेवक, महसूल विभागातील अधिकारी, जमिनीचा मालक, पोलिस अधिकारी, संबंधित मालमत्तेचा शेजारी यांची उपस्थिती आवश्यक असते. ड्रोनच्या सहाय्याने मोजणी झाल्यानंतर उपलब्ध कागदपत्रांच्या पुराव्यानुसार संबंधित जमीनमालकाला डिजिटल प्रॉपर्टी कार्ड देण्यात येते. त्यामुळे ही योजना अत्यंत पारदर्शक आहे असे म्हणता येईल. पूर्वी पारंपरिक पद्धतीने मोजणी होत असल्याने मोठ्या प्रमाणात वेळ आणि मनुष्यबळ लागत होते. परंतु आता आधुनिक पद्धतीने मोजणी होणार असल्याने कमीत कमी वेळ आणि मनुष्यबळ लागणार आहे. आजही जमिनीचे वाद मोठ्या प्रमाणावर आहेत. सदोष प्रशासकीय पद्धतीमुळे हे वाद वर्षानुवर्षे खितपत पडलेले दिसून येतात. न्यायालयाद्वारे जमीन मोजणीला कैक वर्षे लागतात ही वस्तुस्थिती आहे. अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांच्या जमिनी चुकीच्या पद्धतीने वक्फ बोर्डाच्या अखत्यारित आल्या आहेत. आता अशा सर्व जमिनींची चौकशी होणार आहे. या संदर्भात केंद्र सरकार कायदा करणार आहे. ज्याच्या मालकीची जमीन आहे त्याला ती मिळालीच पाहिजे, अशी राज्य सरकारची भूमिका आहे. ग्रामीण भागात तसेच शहरी भागातही अनेक ठिकाणी जमिनीच्या बाबतीत वाद होताना दिसून येतात. हे वाद प्रामुख्याने जमिनीच्या मालकी हक्कावरून होत असतात. काही नागरिकांना जमिनीसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांबद्दल पुरेशी माहितीही नसते. अशा व्यक्तींच्या जमिनीवर गैरमार्गाने कब्जा केला जातो. त्यामुळे बऱ्याच व्यक्तींना त्यांची हक्काची जमीन गमवावी लागते. स्वामित्व योजनेमुळे या साऱ्या समस्या मिटणार आहेत. स्वामित्व योजनेअंतर्गत २३ हजारहून अधिक गावांचे अंतिम नकाशे तयार करण्यात आले आहेत. ७ हजार गावांचे प्रॉपर्टी कार्ड तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या योजनेत लातूर जिल्ह्यातील ६३८ गावांचा समावेश आहे. आतापर्यंत २३३ गावांतील मालमत्ताधारकांना त्यांच्या मालमत्ता पत्रकांचे वितरण करण्यात आले आहे. आतापर्यंत ५०२ गावांच्या सनद प्राप्त झाल्या आहेत. त्यात ६९ हजार ३०४ लाभार्थी आहेत अशी माहिती जिल्हा अधीक्षक, भूमिअभिलेख कार्यालयाने दिली आहे. ग्रामपंचायतीचा नमुना ८ अ हा जागेच्या मालकी हक्काचा पुरावा नाही. स्वामित्व योजनेअंतर्गत मिळणारे प्रॉपर्टी कार्ड हा मालकी हक्काचा अधिकृत पुरावा आहे. या योजनेमुळे हक्काच्या जागेची कायमस्वरूपी नोंद होणार आहे.

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी आणि जल्लोषासाठी सज्ज होताना मागे वळून मावळत्या वर्षातील घडामोडींचे सिंहावलोकन करणे आवश्यक असते. कारण हा भूतकाळ येणाऱ्या भविष्यकाळासाठी दिशादर्शी असतो. त्या परिप्रेक्ष्यातून २०२४ मधील भूराजकीय घटना आणि अर्थकारणाचा वेध घेतला असता सकारात्मक बाबी कितीही मोठ्या प्रमाणावर आणि गर्जना करुन सांगितल्या जात असल्या तरी येणाऱ्या काळातील आर्थिक चिंतांचा घंटानाद या वर्षाने केला आहे, हे निश्चित. अमेरिकेच्या नव्या राष्ट्राध्यक्षपदी विराजमान होणारे डोनाल्ड ट्रम्प हे जगाला आर्थिक अनिश्चिततेकडे घेऊन जातील या शंका खऱ्या ठरणार का हे पाहणे महत्त्वाचे असेल.

आर्थिक चिंतांचा घंटानाद

सीए संतोष घारे, अर्थतज्ज्ञ

दिनदर्शिकेची पाने पालटत पालटत पाहता पाहता वर्षाखेरीचा दिवस येऊन ठेपला. आणखी काही तासांनी नव्या वर्षाची सोनेरी पहाट होईल आणि ती सूर्यकिरणे नव्या आशा, नवे संकल्प, नवी उमेद, नव्या अपेक्षा, नव्या आकांक्षा, नव्या संधी, नवी क्षितिजे यांसोबतच नवी आव्हानेही घेऊन येईल. जीवनचक्रातील एक टप्पा म्हणून या कालगणनेतील बदलांकडे पाहतानाच या टप्प्यावर मावळतीचा वेध घेणेही गरजेचेच ठरते. इतिहासात डोकावून पाहिल्यास प्रत्येक वर्षाची काही वैशिष्ट्ये दिसून येतात. उदाहरणार्थ, २०२२ या वर्षाला रशिया-युक्रेन युद्धाचे वर्ष, २०२० या वर्षाला कोरोना वर्ष म्हणता येईल, २००८ हे वर्ष जागतिक मंदीचे वर्ष ठरले होते. २०२३ हे भारताच्या चांद्रमोहिमेचे वर्ष, जी-२० च्या वार्षिक शिखर संमेलनाचे वर्ष, महिला आरक्षण विधेयकाचे वर्ष, नव्या संसदभवनाचे वर्ष होते. त्याच धर्तीवर २०२४ या वर्षाकडे पाहिल्यास हे वर्ष 'निवडणुकांचे वर्ष' आणि अस्थिरतेच्या संकेतांचे वर्ष म्हणून नोंदवले जाई. याचे कारण आजवरच्या इतिहासात पहिल्यांदाच जगातील ५० देशांमध्ये महत्त्वाच्या निवडणुकांची प्रक्रिया २०२५ मध्ये पार पडली आणि जवळपास २ अब्जांहून अधिक मतदारांनी या निवडणुकांसाठी आपला मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये अमेरिका, भारत, मेक्सिको आणि दक्षिण आफ्रिका या चार देशांसह अन्य देशांचा समावेश आहे.

जागतिक पटलावरील अनेक घटना-घडामोडींनी राजकारणाबरोबरच अर्थकारणाच्या क्षेत्रातही बरीच घुसळण मावळत्या वर्षात दिसून आली. देशाला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था म्हणून विकसित करण्याचे काम २०२४-२५ या काळात पूर्ण करायचे होते.२०१९ च्या निवडणुकींनंतरच्या पहिल्या अर्थसंकल्पात याविषयी भूमिकाही मांडण्यात आली होती. मात्र त्यावेळी येणाऱ्या काळात कोणकोणत्या संकटाला सामोरे जावे लागेल, याची कल्पनाच केलेली नव्हती. इतिहासातील सर्वात मोठी महासाथ कोरोना लाटेने जगातील सर्व अर्थव्यवस्थांना मोठा धक्का बसला. कोरोना ओसरल्यानंतर रशिया आणि युक्रेनचे युद्ध भडकले. पाठोपाठ हमासने इस्त्राईलवर हल्ला केला आणि वर्ष संपता संपता सीरियात धार्मिक मूलतत्ववाद्यांची अनागोंदी सुरू आहे. शेजारच्या बांगला देशात सुरू असलेल्या उन्माद उघड्या डोळ्यांनी आपण पहात आहोत. त्याबाबत कोणती भूमिका घ्यायची या विचारांतच २०२४ ची सांगता होत आहे.

वास्तविक २०२४ वर्ष मावळत असताना आर्थिक आघाडीवर देश आणि जगाची स्थिती कशी राहिली हे पाहणे अधिक महत्त्वाचे ठरेल. या दोन्हीच्या दृष्टीकोनातून पाहिले तर यावर्षी सर्वात मोठ्या घटना आर्थिक घटकाशी संबंधित नाही तर राजकीय आघाडीवरच्या घडल्या. म्हणूनच अर्थशास्त्राचे गणित हे आर्थिकऐवजी राजकीय घडामोडींवर अवलंबून असते या तथ्यावर आणखी एका वर्षाने शिक्कामोर्तब केले.

जगाच्या राजकारणातील सर्वात मोठी घटना म्हणजे द युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिकेच्या सर्वोच्च सत्तास्थानासाठी झालेल्या निवडणुकांमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांचा झालेला महाविजय. काही काळापूर्वी डोनाल्ड ट्रम्प मैदानात असतील, असा विचारही कोणी करत नव्हते. परंतु बराच काथ्याकूट झाल्यानंतर पक्षाने त्यांना उमेदवारी देण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मतमोजणीच्या काळात त्यांना कडवी टक्कर मिळत असल्याचे चित्र निर्माण झाले. परंतु त्यांच्या प्रचंड विजयाचे चित्र समोर आले तेव्हा अमेरिकेसह जगातील सर्वच देश अचंबित झाले. ट्रम्प अद्याप अध्यक्षपदाच्या खुर्चीवर विराजमानही झालेले नाहीयेत, तोवर आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांची कोणती भूमिका राहिल आणि त्यांच्या भूमिकांमुळे जग येणाऱ्या काळात हेलकावे खात कशा प्रकारे अस्थिर आणि अनिश्चित बनणार आहे याची झलक सर्वांना पाहावयास मिळत आहे. ट्रम्प यांच्या आगमनावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर विश्वबंधुत्वासारखी भावना बाजूला ठेवून प्रत्येक देश आपले हित साधण्याचा प्रयत्न करत आहे. ट्रम्पकाळात जगात अमेरिकेचे प्रभुत्व पुन्हा दिसू लागेल आणि चीनची पिछेहाट होईल, असे अमेरिकेत मानले जात आहे. ट्रम्प यांच्या आयात शुल्कवाढीच्या आक्रमक घोषणांनी अर्थव्यवस्थेला आव्हान मिळणार हे लक्षात आल्यानंतर चीनने भरभक्कम आर्थिक पॅकेजची अचानक घोषणा केली. पण वर्ष संपताना या पॅकेजचा कसलाच परिणाम होत नाहीये हे दिसून आले. त्याचा परिणाम म्हणजे चीनकडे पाठ फिरवत परकी गुंतवणुकदारांनी गाशा गुंडाळण्यास सुरुवात केली आहे.

ट्रम्प आणि त्यांचे राजकारण बाजूला ठेवले तर औद्योगिक आघाडी, उद्योग जगत, सामान्य माणसाचे आयुष्य असो किंवा रोजगार असो या ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच आर्टिफिशयल इंटिलिजन्सचा बोलबाला राहिला. एआयची वेगाने वाढणारी व्याप्ती ही यावर्षातील सर्वात मोठ्या घडामोडीपैकी एक मानता येईल. एआयला आपल्या आयुष्यात कितपत स्थान द्यायचे यावर चर्चा सुरू असताना त्याने आपल्या आयुष्यात एवढा शिरकाव केला आहे की त्यापासून दूर जाणे आता अशक्य झाले आहे. मोठ्या कंपन्यांच्या मोठ्या उलाढाली, राजकीय पक्षाच्या प्रचारयुद्धापासून शाळेत शिकणाऱ्या मुलांचा गृहपाठापर्यंत एआयने घुसखोरी केली आहे. एवढेच नाही तर त्याने बस्तान मांडले आहे. एआयच्या परिणामामुळेच संगणकाची चिप तयार करणारी कंपनी 'एनवीडिया'ने यावर्षी ॲपल आणि मायक्रोसॉफ्टला मागे टाकत सर्वात मोठी कंपनी म्हणून लौकिक मिळवला. अर्थात त्यानंतर मोठी घसरण झाली आणि ती तिसऱ्या क्रमाकांवर थांबली. परंतु गेल्या दहा वर्षांत या कंपनीच्या शेअरमध्ये ३२६६ पट वाढ झाली आहे. वर्ष संपता संपता 'गुगल' या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील दिग्गज कंपनीने सुपर कॉम्प्युटरना कोसो दूर मागे सारणारी विलो चिप आणून उद्याच्या भविष्यातील नव्या क्रांतीचा ओनामा केला आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून विचार करता केंद्रातील स्थिर सरकारमुळे धोरणसातत्य राहील यावर शिक्कामोर्तब झाले असले तरी आर्थिक चिंता वाढवणाऱ्या अनेक घटना या काळात घडल्या. शेअर बाजारात जबरदस्त उसळी येण्याचे वातावरण याही काळात राहिले. मात्र आयपीओच्या बाजारात धुमाकूळ घालणाऱ्या कंपन्यांनी एकुण सुमारे तीन कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम शेअर बाजारातून गोळा केली. दुसरीकडे विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी जवळपास एक लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम भारतीय बाजारातून काढून घेतली आहे. फ्युचर आणि ऑप्शन ट्रेडिंगमध्ये लाखो कोटी रुपये गमावणाऱ्या नवट्रेडर्सची दखल घेत मावळत्या वर्षात सेबीने यासंदर्भातील नियमांमध्ये कठोरता आणली आहे. त्यामुळे बाजारातील व्हॉल्यूम कमी झाले असले तरी हे पाऊल दीर्घकालीन फायद्याचे आहे. तथापि, सेबीच्या अध्यक्षा माधवी पुरी बुच यांच्याविरोधातील संशयाचे धुके निर्माण होणे ही घडामोड अनेक प्रश्न जन्माला घालणारी ठरली.

मावळत्या वर्षांच्या अखेरीस रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी शक्तिकांत दास यांना मुदतवाढ न देता संजय मल्होत्रा यांची नवे गव्हर्नर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्र सरकार आणि उद्योगजगताकडून व्याजदरकपातीसाठीच्या दबावाचा सामना ते कसा करतात हे पाहणे आता औत्सुक्याचे असेल. परंतु महागाईच्या मुद्द्यावर केंद्र सरकारला अपयश आल्याचे सरत्या वर्षाने दाखवून दिले आहे. तसेच आरबीआयच्या अहवालात पुढील वर्षासाठीच्या विकासदराचे अनुमानही घटवण्यात आले आहे. याखेरीज २०२५ मध्ये अन्नधान्यांची महागाई आव्हान ठरेल असे आरबीआयने म्हटले आहे. त्यामुळे येणारे वर्ष हे आर्थिक दृष्ट्या आव्हानात्मक असणार आहे.

सरकारच्या पीएलआय योजनेचे परिणाम प्रत्यक्षात दिसत आहेत. सर्वात मोठा परिणाम स्मार्टफोनबाबत दिसत आहे. एकीकडे भारताच्या निर्यातीत ४२ टक्के वाढ झाली आहे. केवळ ऑक्टोबर महिन्यांत भारतातून दोन अब्ज डॉलरचे स्मार्टफोन बाहेर गेले असून तो विक्रम मानावा लागेल. दुसरीकडे राहणीमान आणि खानपानात झालेला बदल हा २०२४ मध्ये स्पष्ट दिसत आहे. फूड डिलिव्हरी कंपनी झोमॅटो आता मार्केट कॅपच्या दृष्टीने टाटा मोटर्स आणि बजाज ऑटो पेक्षा मोठी कंपनी झाली आहे आणि त्यास शेअर बाजारातही बळकटी मिळाली आहे. अशा कितीतरी कंपन्या आणि स्टार्टअप नव्याने उभे राहत असून त्या आपल्या गरजा आणि हौस भागविण्याचे काम करत आहेत आणि परिसरातील लोकांना रोजगार देत आहेत. मात्र २०२४ मध्ये एक मोठी चिंता बाजाराला भेडसावत असून ती म्हणजे मागणीत घट होणे. आज लाखो गाड्या विक्रीविना उभ्या आहेत. सलग दोन तिमाहीतील निकाल निराशाजनक राहत आहेत. मावळत्या वर्षांत ही चिंता शेअर बाजारातही उमटताना दिसत आहे. पण जानेवारीत चित्र बदलण्याची आशा आहे. भारत ब्रिटनला मागे टाकत जगातील पाचवी अर्थव्यवस्था झाली आहे. नव्या वर्षात जपानला देखील मागे टाकत चौथ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था होऊ शकेल. अर्थात पाच ट्रिलियन डॉलरचे लक्ष्य दूर आहे. मात्र साडेचार ट्रिलियन डॉलरच्या आसपास राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. २०२५ मध्ये भारताच्या विकासाची दिशा ही आपण प्रत्येक आघाडीवर कशा रितीने काळजीपूर्वक पावले टाकतो, यावर अवलंबून असली तरी या अर्थकारणाची नाडी अमेरिकेतील नव्या अध्यक्षांच्या हाती असेल हे निश्चित. ब्रिक्स देशांनी पर्याय चलन विकसित केल्यास अमेरिका त्यांना अद्दल घडवण्यासाठी १०० टक्के आयात शुल्क लावेल असा सज्जड दम ट्रम्प यांनी दिला आहे. अमेरिकन वस्तूंवरील आयात शुल्क कमी करण्यासाठी ते भारतावर दबाव आणत आहेत. मागील काळात इराणकडून होणारी तेलआयात बंद करण्यासाठीच्या ट्रम्प यांच्या दबावापुढे भारत झुकला होता. आता तोच कित्ता रशियाबाबत गिरवला जातो का, प्रिडेटर ड्रोन आणि जेट इंजिनबाबत ट्रम्प यांची भूमिका काय असेल या सर्व आर्थिक प्रश्नांच्या झाकोळांनी २०२४ ची सांगता होत आहे. जागतिक पटलावरील संस्था २०२५ मधील आर्थिक मंदीची घंटा वाजवत आहेत. त्यामुळे येणारे वर्ष जगाबरोबरच भारतासाठीही आर्थिक दृष्ट्या आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे.

पंचांग **मंगळवार, दिनांक ३१ डिसेंबर २०२४**. पौष शु.१, पूर्वाषाढा, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, उत्तरायण, हेमंत ऋतू. **नक्षत्र :** पूर्वाषाढा, योग :ध्रुव, करण : किंस्तुघ्न.
सूर्योदय : स.०६.५३, सूर्यास्त : सायं.०५.४१ वा.
राहू काळ : दुपारी : ३:०० ते ४:३०

दिनविशेष ▶१३८४ : इंग्रजीत बायबलचा भागश: अनुवाद करणाऱ्या जॉन वायक्लीफचा मृत्यू.
▶१५१४ : आधुनिक शरीराशास्त्राचा पाया घालणाऱ्या ॲंड्रियर्स व्हेसॅलियस या वैद्यक शास्त्रज्ञाचा जन्म. ▶१६६८ : रूग्णाच्या शारिरीक तपासणीचे महत्व विशद करणाऱ्या हर्मद बोअरहाफचा जन्म. ▶१७२० : चार्ल्स एडवर्ड स्टुअर्टचा जन्म. हा 'यंगप्रिटेंडर' म्हणून ओळखला जात असे. त्याच्या वडिलांना 'ओल्ड प्रिटेंडर' म्हणत. ▶१८०२ : वसईचा कुप्रसिद्ध तह. या तहान्वयामुळे दुसऱ्या बाजीरावाच्या माथी तैनाती फौजा मारण्यात आल्या. ▶१८६९ : हेन्री मॅटिस्से या कलाकाराचा जन्म. ▶१९१० : श्रेष्ठ गायक मल्लिकार्जुन भीमरायप्पा मन्सूर यांचा जन्म. ▶१९२३ : वि.का.राजवाडे या इतिहासाचार्यांचा मृत्यु. ▶१९५१ : शतकाहून अधिक काळ प्रकाशित होणाऱ्या ज्ञान प्रकाशचा अखेरचा अंक प्रकाशित झाला. ▶१९९६ : मसुरा-श्रमाच्या चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते. सुर्यनमस्काराच्या प्रसारासाठी विनामूल्य दासबोध वितरणाचे प्रवर्तक भालचंद्र शिवराम उर्फ काका जोशी यांचे निधन. ▶१९९७ : स्वरराज छोटा गंधर्व यांचे निधन. ▶२००१ : एअरचीफ मार्शल ए.वाय. टिपणीस यांनी हवाई दलाची सूत्रे नवे एअरचीफ मार्शल एस. कृष्णस्वामी यांच्या हाती सुपुर्द केली.

राशीभविष्य ▲**मेष** : केलेल्या कामाचे श्रेय मिळेल. ▲**वृषभ** : मोठ्या व्यक्तींकडून प्रशंसा. ▲**मिथुन** : सुसंगती घडेल. ▲**कर्क** : मजेत वेळ जाईल. ▲**सिंह** : कामाचा कंटाळा येईल. ▲**कन्या** : मतभेद होतील. ▲**तुळ** : आवडत्या व्यक्तीची भेट होईल. ▲**वृचिक** : मनोरंजन कराल. ▲**धनु** : कामात दिरंगाई होईल. ▲**मकर** : अतिश्रम टाळा. ▲**कुंभ** : अनपेक्षित कामे पूर्ण होतील. ▲**मीन** : जीवलग साथदार भेटतील.

चिंतन प्रामाणिकपणे भरपूर कष्ट करा. त्यापासून आत्मिक समाधान मिळेल. त्यातून सर्वांप्रती असलेली कर्तव्यपूर्तता सुरु केली की त्यापासून आनंदाची प्राप्ती होईल. सर्व आयुष्य उजळून निघेल.– **स्वामी विवेकानंद**

व्यक्तीविशेष

अभिनेता बेन किंग्जले

१९८२ मध्ये प्रदर्शित झालेल्या गांधी या चित्रपटात म. गांधींची भूमिका करणारे अभिनेते म्हणून बेन किंग्जले आपल्याला माहित आहेत. आज त्यांचा वाढदिवस. ते ब्रिटिश अभिनेते आहेत. त्यांचा जन्म ३१ डिसेंबर १९४३ रोजी इंग्लंडमध्ये झाला. त्यांचे मूळ नाव कृष्णा भांजी. त्यांचे वडिल रहिमतुल्ला हिरजी भांजी हे मूळचे भारतीय. बेन किंग्जले यांचे पदवीपर्यंत शिक्षण इंग्लंडमध्येच झाले. शालेय जीवनापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती आणि आधी शाळेत आणि नंतर महाविद्यालयांत त्यांनी अनेक नाटकांत भूमिका केल्या. १९६६ पासून त्यांनी अभिनेता म्हणून काम करायला सुरुवात केली. चित्रपटाकडे त्यांचा ओढा होता. पण तरीही रंगभूमीवर काम करणे सोडले नाही. १९७७ च्या सुमारास पीटर ब्रुकसारख्या जगप्रसिद्ध नाट्या दिग्दर्शकाबरोबर ते काम करत होते. त्याचवेळी त्यांनी कृष्णा भांजी हे नाव बदलून बेन किंग्जले हे नाव धारण केले. १९७२ मध्ये प्रदर्शित झालेला फीअर इज द की हा त्यांचा पहिला चित्रपट. पण १९७८ मध्ये प्रदर्शित झालेल्या गांधी या चित्रपटाने त्यांना जगभरात लोकप्रियता आणि प्रसिद्धी मिळाली. या चित्रपटातील भूमिकेसाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. त्यानंतर त्यांचे अनेक चित्रपट आणि टीव्ही मालिका प्रदर्शित झाल्या. अनेक मानसन्मान त्यांना मिळाले. सद्या ते ऑक्सफर्डशायर परगण्यातील स्पेल्सबरी येथे राहत आहेत.

बोधकथा

भुरळ मोठेपणाची

मोठेपणा कोणाला नको असतो. काहीही परीश्रम न घेता राजेपण मिळते आहे हे बघून हत्ती खूष झाला. खऱ्या-खोट्याचा त्याने विचारच केला नाही. उताविळपणे तो कोल्ह्याच्या मागे जावू लागला. लबाड कोल्ह्याने हत्तीला झुलवत न्यायला सुरुवात केली. वाटेत एक चिखलाने भरलेले तळे होते. हत्तीच्या ते लक्षात आले नाही. तो सरळ त्या तळ्यात शिरला आणि चिखलात रुतून बसला. कोल्ह्याला म्हणाला, 'मला लवकर बाहेर काढ. मुहूर्त टळेल. त्यावर कोल्हा हसत हसत म्हणाला, 'अरे मुर्खा इतका कसा तू सहज विश्वास ठेवला. आता रहा याच चिखलात.' असे म्हणून कोल्हा तेथून सटकला आणि नंतर साऱ्या कोल्ह्यांनी त्या हत्तीवर येथेच्छ ताव मारला. **(उत्तरार्ध)**

जिज्ञासा

मुंग्यांमुळे लागला फॉर्मिक आम्लाचा शोध

कार्बनी रसायन शास्त्राच्या सुरुवातीच्या काळात अनेक शास्त्रज्ञ वेगवेगळ्या घटक पदार्थांचे रासायनिक विश्लेषण करण्याच्या प्रयत्नात होते. सजीवांमधील घटकातून कोणते रसायन मिळते यामध्ये जणू युरोपीयन संशोधकांमध्ये स्पर्धा सुरू होती. तेथील रसायन शास्त्रज्ञ जॉन रे यांना एकदा लाल मुंग्या चावल्या. लाल मुंग्या चावल्यानंतर केवढी आग होते याचा अनुभव बहुतेकांनी घेतलाच असेल. त्याप्रमाणे जॉन यांनाही त्रास होऊ लागला. ते वेदना बघून त्यांनी विचार केला की या मुंग्यांमध्ये आग निर्माण करणारे असे कोणते रसायन असावे. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी एक प्रयोग केला. त्यांनी बऱ्याच मुंग्या पकडल्या.

त्या मुंग्यांची डोकी धडावेगळी करून ही डोकी पाण्यात घालून उकळवली. नंतर पाण्यात उतरलेल्या रासायनिक पदार्थांचे विश्लेषण करून त्याचे गुणधर्म तपासले. त्या वेळी हे एक प्रकारचे आम्ल असल्याचे त्यांना आढळले. लॅटीन भाषेत मुंग्यांना फॉर्मिका असे म्हणतात. म्हणून या आम्लाला त्यांनी फॉर्मिक आम्ल असे नाव दिले. हे आम्ल अतिशय दाहक असून त्याचा छोटासा थेंबही शरीराची आग करण्यास पुरेसा होतो. फॉर्मिक आम्लाचे रासायनिक विश्लेषण करताना त्यांना दिसलेले स्वरूप असे होते. एका कार्बन अणूला हे हायड्रोजन, एक ऑसिजन आणि एक आयड्रॉसिक्न अणू समूह जोडलेला असून या तिनही अणूंच्या ठिकाणी इतर अणू समूह आल्यास वेगवेगळ्या प्रकारची संयुगे तयार होतात हेही पुढे लक्षात आले. मृत प्राण्यांचे किंवा शरीर अवयवांचे नमूने खराब न होता टिकवण्यासाठी फॉर्मेलीन हे अशाच प्रकारे हायड्रॉक्सिन समूहाऐवजी हायड्रोजन अणू आणून त्यावर आणखी एक प्रक्रिया करून त्यापासून बनवतात.

सामान्यज्ञान

रॉस समुद्र

इ. स. १८४१ मध्ये जेम्स क्लराक रॉस या ब्रिटिश समन्वेषकाने या भागाचा शोध लावला. त्याच्या नावावरूनच याला रॉस समुद्र हे नाव देण्यात आले. हा समुद्र सुरुवातीला दक्षिण ध्रुवाचे प्रमुख प्रवेशद्वार म्हणून प्रसिद्ध होता. या समुद्रामुळे खंडाचा गोलाकार तुटला आहे. समुद्राच्या पश्चिम भागास रॉस व पूर्व भागात रुझवेल्ट ही प्रमुख बेटे असून रॉस बेटावर मौंट एरेबस हा प्रसिद्ध जागृत ज्वालामुखी आहे. या समुद्राचा दक्षिण भाग तरत्या, परंतु स्थिर अशा प्रचंड रॉस हिमतटाने व्यापलेला असून तो जगातील एक मोठा तरता हिमतट मानला जातो. हा रॉस बॅरिअर या नावानेही ओळखला जातो. हा हिमतट दक्षिण ध्रुवापर्यंत पसरलेला असून याचे क्षेत्रफळ सुमारे पाच लाख चौरस किलोमीटर इतके आहे. अंटार्क्टिका संशोधनासाठी रिचर्ड बर्ड या अमेरिकन संशोधकाने उभारलेला लिटल अमेरिका हा तळ याच भागात रॉस हिमतटावर होता.

सोडवा सुडोकू सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

क्रमांक ५४६

1	3		
		1	4

क्रमांक ५४५ चे उत्तर

4	3	2	1
3	4	1	2
2	1	3	4
1	2	4	3

हास्यविनोद

पप्पू : माझ्या बायकोला माझ्याबरोबर फिरायला जायचे आहे, मला रजा हवी आहे सर!
बॉस : अजिबात रजा मिळणार नाही.
पप्पू : थँक यू सर, मला माहीत होते संकटकाळात तुम्हीच माझी मदत कराल म्हणून!

बंड्या : समोरची मुलगी बहिरी आहे.
मित्र : तुला कसे काय समजले?
बंड्या : आताच मी तिला प्रपोज केले तर ती म्हणाली, पायातील सँडल पाहिली का?

महिलायन

सकारात्मक विचार आवश्यक

सतत मनात काळजी केल्यामुळे आरोग्यावर विपरित परिणाम होत असतो. हे लक्षात घेऊन कुठल्याही निर्णयाबाबत व्यवहारदृष्टीकोन ठेवावा. चांगल्याचा आग्रह नक्कीच धरावा. पण मनाविरुद्ध घटना घडल्या तरीही जास्त त्रास करून घेऊ नये. महिलांसाठी आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वत:ची किंवा स्वत:च्या कुटुंबाची तुलना इतरांशी करून घेऊ नये.

कुठलही व्यक्ती परिपूर्ण नसते. प्रत्येकाची परिस्थिती वेगवेगळी असते. हे लक्षात घेऊन आपल्याला जे सहज साध्य आहे ते करावे आणि त्यातच आनंद मानावा. इतरांशी केलेली तुलना तणावाला आमंत्रण ठरू शकते. सर्वच महिला नोकरी करत नाहीत. अशा वेळी फावल्या वेळात नुसते टीव्ही किंवा संगणकावर बसून वेळ वाया घालवण्याऐवजी नवनवीन लोकांशी ओळख वाढवावी. जे सतत एकटे राहतात त्यांना इतरांच्या तुलनेत आरोग्याचे त्रास होण्याची शक्यता दुपटीने वाढते. निरोगी राहण्यासाठी मित्र असणे, नवीन लोकांच्या भेटीगाठी घेणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे. तसेच शक्यतोवर आजूबाजूच्या लोकांशी खेळीमेळीचे नात

सोमवती अमावस्यानिमित्त हजारो भाविकांची गर्दी

भंडारा खोबऱ्याच्या उधळणीत धामणीत "सदानंदाचा येळकोट"

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

लोणी-धामणी : पुणे, नगर, नाशिक, मुंबई जिल्ह्यातील हजारो भाविकांचे कुलदैवत असणाऱ्या धामणी (ता. आंबेगांव) येथे सोमवारी सोमवतीच्या निमित्ताने हजारो भाविकांनी गर्दी केली होती. सकाळी ७ वाजता खंडोबा देवाच्या उत्सवमूर्तीच्या पालखी सोहळ्याने उगवत्या सूर्याच्या साक्षीने मंदिरातून देवमळ्यातील विहीरीवर शाहीस्नानासाठी प्रस्थान ठेवले. यावेळी भंडार खोबऱ्याच्या व फुलांच्या उधळणीत " सदानंदाचा येळकोट " चा जयघोष करण्यात आला. पारंपारिक वाद्याच्या व फटाक्याच्या आतषबाजीत सोमवती सोहळ्याला सलामी देण्यात आली.

हिंदू धर्माच्या पंचागानुसार मराठी मार्गशीर्ष महिन्यातील शेवटच्या सोमवारी (३० डिसेंबर) पहाटे चार वाजून एक मिनिटाने सोमवती अमावस्येचा प्रारंभ झाला. मंगळवारी सकाळी ३ वाजून ५६ मिनिटापर्यंत सोमवतीचा पर्वकाळ असल्याने, याच पर्वकाळात देवाच्या उत्सवमूर्तीच्या शाहीस्नानासाठी व पालखी सोहळ्यासाठी धामणी येथे पंचक्रोशीतील भाविकांनी अलोट गर्दी केलेली होती.

सोमवारी पहाटे मंदिरातील सप्तशिवलिंगाचा अभिषेक व आरती झाल्यानंतर सकाळी वाघे व वीर मंडळीनी गावातून पालखी खंडोबा मंदिरात नेऊन मंदिरातील पंचधातूचा खंडोबा, म्हाळसाई व बाणाईचे सर्वांगसुंदर मुखवटे परंपरागत सेवेकरी भगत मंडळीकडून घेऊन ते वाजतगाजत देवमळ्यातील

धामणी (ता.आंबेगाव) येथे श्री म्हाळसाकांत खंडोबाच्या पालखीची काढलेली मिरवणूक.

विहीरीवर आणले. सोमवतीच्या व देवाच्या मानाच्या काठीच्या मानकरी मंडळीच्या व भाविकांच्या हस्ते खंडोबा, म्हाळसाई व बाणाईच्या मुखवट्याला सुवासिक चंदन पावडर गुलाबपाणी व पुदीन्याचे अत्तराचा लेप देऊन शाहीस्नान घालण्यात आले.

देवस्थानाचे सेवेकरी धोंडीबा भगत, दादाभाऊ भगत, शांताराम भगत, सुभाष तांबे, प्रभाकर भगत, माऊली जाधव वाघे, सिताराम जाधव वाघे, दिनेश जाधव, नामदेव पवार वीर, दिलीप पवार, राजेश भगत, पांडुरंग भगत, राहूल भगत, खंडू भगत, नामदेव भगत या परंपरागत सेवेकरी मंडळीनी खंडोबाची पूर्वकालीन सुरु असलेली पारंपारिक पूजा केली. फुलांनी सजवलेल्या पालखीची गावातील पेठेतून पारंपारिक वाद्याच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी "सदानंदाचा येळकोट" चा जयघोष करुन व फटाक्याची आतषबाजी करुन फुलांची व भंडाऱ्याची उधळण करण्यात आली. यामुळे धामणीतील सोमवतीचा सोहळा चांगलाच रंगला असल्याचे भक्तांना पाहावयास मिळाले.

देवमळ्यातील विहीरीवर सोमवती स्नानाची पर्वणी साधण्यासाठी गावडेवाडी, महाळूंगे पडवळ, गुंजाळवाडी, लांडेवाडी, तळेगांव ढमढेरे, मरकळ, बेल्हे, नांदूर, कुरकूटवाडी, पाडळी पारनेर, भराडी, फाकटे, कवठे, संविदणे, लोणी, खडकवाडी, पाबळ येथील हजारो भाविकांनी गर्दी केली होती. देवाच्या मुखवट्याला स्नान घालण्यासाठी महिला भाविकांची गर्दी लक्षणीय होती. उपस्थित सर्व भाविकांनी सोमवतीच्या शाहीस्नानाचा आनंद घेतला. सकाळी नऊ वाजता खंडोबाचे शाहीस्नान झाले. त्यानंतर पूजा व महाआरती होऊन देवाच्या मुखवट्यावर फुले व भंडारा उधळण्यात आला व त्यानंतर ग्रामस्थांच्या व देवस्थानाच्या वतीने सोमवतीचे मानकरी, देवाच्या काठीचे मानकरी, सेवेकरी व खांदेकरी आणि उपस्थित पंचक्रोशीतील भाविकांचा तसेच खेड, आंबेगांव, जुन्नर, शिरुर व पारनेर तालुक्यातील विविध आडनावाच्या कुळांचा सोमवतीचे मानपान देऊन, तर महिला भाविकांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी देवस्थानचे अध्यक्ष प्रकाश जाधव पाटील, सरपंच रेश्मा बोऱ्हाडे, माजी सरपंच सागर जाधव, उपसरपंच अक्षय विधाटे, मनोज तांबे, कांताराम तांबे, भगवान वाघ, सरपंच मच्छिद्र वाघ, गणेश तांबे, डॉ. पाटीलबुवा जाधव, बाळासाहेब लालजी बढेकर, विठ्ठल बढेकर, बाळासाहेब महादू बढेकर, मिलींद शेळके, निलेश करंजखेले, उत्तम जाधव, कैलास वाघ, भगवान बढेकर, सुभाष सोनवणे आदी उपस्थित होते. त्यानंतर सकाळी दहा वाजता उत्सवमूर्ती पालखीत ठेवण्यात येऊन पालखीचे देवमळ्यातून शाही मिरवणूकीसाठी धामणीच्या पेठेत प्रस्थान झाले. सोमवतीच्या सोहळ्यात मानकरी पंचरास मंडळीच्या ताफ्यातील डफडे, ढोलकी, ताशा, संबळ, सनई तुतारीच्या पारंपारिक वाद्यात दिमाखदार मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकीत पालखीच्या पुढे लांडेवाडी (ता. आंबेगांव) मानकरी शेवाळे बंधू यांनी आणलेले खंडोबाचे वाहन असलेले रुबाबदार सजवलेले दोन अश्व सर्व भाविकांचे लक्ष वेधून घेत होते. दिमाखदार मिरवणूक वाजत गाजत दुपारी बारा वाजता मंदिरात स्थिरावली व पालखीतील देवाचे पंचधातूचे मुखवटे पारंपारिक सेवेकरी भगत मंडळीच्या स्वाधीन करण्यात आले.

सोमवतीला येणाऱ्या भाविकांसाठी देवस्थानाच्या वतीने महाप्रसाद ठेवला होता. दुपारी दोन वाजेपर्यत दोन हजाराहून अधिक भाविकांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला असल्याचे देवस्थानचे पूजारी दादाभाऊ भगत यांनी सांगितले. सकाळपासून दर्शनासाठी भाविक येत होते. दुचाकी व चारचाकी वाहानाने येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी दिसत होती.खोबरे भंडारा विक्रीची व फुलांच्या हाराची आणि पेढ्याची दुकाने मंदिराबाहेर थाटलेली दिसत होती. भाविकांच्या महाप्रसादाची सोय कुलस्वामी हॉल व जागरण देवकार्य सभामंडपात केलेली होती. भाविकांना शुध्द पिण्याचे पाण्याची चांगली सोय केलेली होती. पुढील वर्षी सोमवतीचा पर्वकाळ नसल्याने, ठिकठिकाणच्या खंडोबा भक्तांना एक वर्षाची (२०२६) ची प्रतिक्षा करावी लागल्याची हूरहूर भाविकांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी येथील खंडोबा देवस्थानासाठी चांदीची तलवार,चांदीची पगडी व भक्ती शक्तीचे प्रतिक छत्रपती शिवाजी महाराज व संत तुकाराम महाराज यांचे संगमरवरी आकर्षक शिल्प अर्पण करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

इंद्रायणी नदी फेसाळली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

आळंदी : पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतून इंद्रायणी नदीत थेट मैला मिश्रित सांडपाणी आणि उद्योगाचे केमिकल रसायन मिश्रित दूषित पाणी येत असल्याने तीर्थक्षेत्र आळंदीत इंद्रायणी नदी पुन्हा फेसळली असून, नदी प्रदूषण वाढल्याने भाविक, नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे.

नदी प्रदूषण रोखण्यासाठी उपाय योजना आवश्यक असल्याने नदी प्रदूषण मुक्त व्हावी अशी मागणी आळंदीतून जोर धरत आहे. आळंदीतील कीर्तनकार चिदंबरेश्वर साखरे, तुकाराम महाराज ताजने, विश्वकर्मा महाराज पांचाळ, पुयड महाराज, दिलीप महाराज ठाकरे, कृष्णाजी डहाके आदीसह नागरिक भविकांतून नाराजी व्यक्त होत असून त्यांनी इंद्रायणी प्रदूषण मुक्त व्हावी अशी मागणी केली आहे.

'येळकोट येळकोट जय मल्हार'चा जयघोष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

कारेगाव : पारोडी (ता. शिरुर) येथे भीमा नदी पात्रात श्री क्षेत्र ढोकसांगवी येथील कुलदैवत श्री खंडोबा देवाच्या मूर्तीना 'येळकोट येळकोट जय मल्हार' च्या निनादात सोमवती अमावस्येनिमित्त जलस्नान घालण्यात आले. या वर्षातील ही शेवटची सोमवती अमावस्या असल्याने तरुणासह भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.

ढोकसांगवी येथे सकाळी पावणे सात वाजता श्री खंडोबा देवाची महापूजा व सामूहिक आरती खंडोबा देवाचे पुजारी शरद गुरव यांच्या हस्ते संपन्न झाल्यानंतर श्रींची मूर्ती पालखीत विराजमान करुन पालखीचे वाजत गाजत पारोडीकडे ता.शिरुर प्रस्थान झाले.यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते. पारोडीत सकाळी अकरा वाजता श्रींच्या मूर्तीना पालखीतील सहभागी व्यक्तींच्या हस्ते भीमा नदीत स्नान घालण्यात आले. त्यानंतर देवाची आरती व तळीभंडार झाल्यानंतर पालखी दुपारी पावणे एक वाजण्याच्या सुमारास पुन्हा ढोकसांगवी गावाकडे परतीच्या प्रवासासाठी मार्गस्थ झाली. यावेळी, 'सदानंदाचा येळकोट, येळकोट येळकोट जय मल्हार' चा जयघोष करण्यात आला. पालखी मार्गावर या पालखीचे ठिकठिकाणी स्थानिक नागरिकांनी स्वागत करत श्रींचे मनोभावे दर्शन घेतले. या पालखी सोहळ्यात भाविक व ग्रामस्थ अनवाणी सहभागी होत असतात.

दरम्यान,ही पालखी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास गावांत आल्यानंतर ग्रामस्थांनी जल्लोषात व उत्साहात स्वागत केले. त्यानंतर मंदिरात श्री खंडोबा देवाची सामूहिक आरती झाल्यानंतर तळीभंडार करण्यात आले.

» Selected

जारकरवाडी उपसरपंचपदी सुवर्णा एकनाथ भांड

लोणी-धामणी : जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी सुवर्णा एकनाथ भांड यांची बिनविरोध निवड झाली. मावळत्या उपसरपंच कौसल्या भोजने यांनी उपसरपंचपदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदासाठी ग्रामपंचायत सदस्यांची बैठक झाली. यावेळी सुवर्णा एकनाथ भांड यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सरपंच प्रतीक्षा बढेकर, ग्रामपंचायत सदस्य सचिन टाव्हरे, पुष्पा जारकड, सुरेश मंचरे, श्रावण काकडे, सुभाष लबडे, कौसल्या भोजने, रूपाली कजबे, अलका कापडी, शाम बढेकर आदी ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. सुवर्णा एकनाथ भांड यांची उपसरपंच पदी निवड झाल्याने ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती ए. एस. अमराळे यांनी काम पाहिले.

लॉन्ड्री व्यावसायिकांना पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ

शिक्रापूर : शिरुर तालुक्यातील सर्व लॉन्ड्री व्यावसायिकांना शासनाच्या पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करत भारतीय

जनता पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोदजी वाकोडकर यांच्या उपस्थितीत तालुक्यातील सर्व लॉन्ड्री व्यावसायिकांची जानेवारी २०२५ च्या पहिल्या आठवड्यात बैठक घेणार असल्याचे भारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे संजय पाचंगे यांनी सांगितले आहे. लॉन्ड्री व्यावसायिकांसह धोबी समाजासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत प्रशिक्षणासह आर्थिक मदत करण्याची योजना आणली असून, शिरूर तालुक्यात एकशे पन्नास हून अधिक लॉन्ड्री व्यावसायिक आहेत. शासनाच्या पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ मिळवण्यासाठी सर्व लॉन्ड्री व्यवसायीकांनी संपर्क साधण्याचे आवाहन भारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय पाचंगे यांनी केले. पी एम विश्वकर्मा योजनेअंतर्गत पहील्या टप्प्यात एक लाख रुपये, दुसऱ्या टप्प्यात दोन लाख रुपये कर्ज पाच टक्के व्याजदराने कोणत्याही हमी शिवाय देण्याची आर्थिक मदत मिळण्यासाठी उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय पाचंगे यांनी मोहीम हातात घेतली आहे. या योजनेची माहिती सर्व लॉन्ड्री व्यावसायिकांपर्यंत पोहचलेली नसल्याने, संजय पाचंगे यांनी पुढाकार घेत तालुक्यातील लॉन्ड्री व्यावसायिकांची बैठक बोलावण्याचा निर्णय घेतला आहे.

विजयस्तंभाच्या सजावटीस सुरुवात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

रांजणी : शिक्रापूर

कोरेगाव भीमासह पेरणे फाटा येथे एक जानेवारी रोजी होणाऱ्या २०७ व्या शौर्यदिनाच्या कार्यक्रमासाठी विजयस्तंभास प्रथमच आगळीवेगळी फुलांची आकर्षक सजावट करण्यात येणार असताना विजयस्तंभाच्या आकर्षक सजावटीस नुकतीच सुरुवात करण्यात आली आहे.

कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी या शौर्यदिनी होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या तयारी साठी प्रशासनाने चांगली काळजी घेतलेली असताना, येथील पंच्याहत्तर फुटी ऐतिहासिक जयस्तंभास जिल्हाधिकारी सिहास दिवसे यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीच्या माध्यमातून काही संघांच्या देखरेखीखाली सजावट करण्यास सुरुवात आली. अग्निशामक दलाच्या बंबांच्या सहाय्याने स्तंभ पाण्याने धुवून घेत, त्याला आकर्षक फुलांची सजावट करण्याची सुरुवात करण्यात आलेली आहे. यावर्षीच्या सजावटीमध्ये जयस्तंभला पंचशीलच्या चौकटीत भारतीय संविधानाची उद्देशिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तेलचित्र तसेच वर जय भिम घोषवाक्य सह निळा ध्वज अशा स्वरूपाचा अनोखा संगम दिसणार आहे.

वाघाळे-जातेगाव पदयात्रा

रांजणगाव गणपती : वाघाळे येथील श्रीकृष्ण ज्ञानमंदिराच्या वतीने वाघाळे ते जातेगाव अशा पद यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

मार्गशीर्ष मासा निमित्त व सफला एकादशीचे औचित्य साधून मार्गशीर्ष कृ. एकादशी गुरूवार दि. २६ डिसेंबर रोजी जितेंद्रमुनी बाळापूरकर प्रतिष्ठाण वाघाळे द्वारा श्रीकृष्ण ज्ञान मंदिर वाघाळे ते श्रीदत्तमंदिर जातेगाव अशा एकदिवसीय पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेत वाघाळे गावातील भाविक भक्त, महिला व बालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोमवतीनिमित्त थापलिंग खंडोबाच्या काठी पालखीची वाजत गाजत मिरवणूक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

रांजणी : सोमवती अमावस्येनिमित्त नागापूर (ता. आंबेगाव) येथिल थापलिंग खंडोबा देवाच्या काठी पालखीची वाजत गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भाविक भक्तांनी काठी नाचविण्याचा आनंद लुटला.

थापलिंग गडावर पहाटे खंडोबा देवाची विधिवत पूजा करण्यात आली.त्यानंतर पारंपारिक वाद्यांच्या गजरात खंडोबा देवाच्या काठी पालखीची मिरवणूक काढण्यात आली. थापलिंग गडावरुन खाली नागापूर गावात काठी पालखी आल्यानंतर भाविक भक्तांनी काठी नाचविण्याचा आनंद लुटला. यावेळी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष देवदत्त निकम यांनीही खंडोबा देवाची काठी नाचवून आनंद लुटला . मिरवणूकी नंतर पवित्र मीना नदीत खंडोबा देवाला स्नान घालण्यात आले. त्यानंतर नागपूर गावचे ग्रामदैवत श्री नागेश्वर मंदिरात थापलिंग देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष देवदत्त निकम यांच्या हस्ते महाआरती घेण्यात आली. यावेळी ग्रामस्थ, परिसरातील भाविक भक्त उपस्थित होते. सोमवती अमावस्ये निमित्त थापलिंग गडावर दिवसभर भाविकांनी येऊन खंडोबा देवाचे दर्शन घेतले.

ढगाळ हवामानाचा तुरीला फटका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नारायणगाव : ढगाळ वातावरणाचा फटका तुर पिकाला अधिक प्रमाणात बसला असून तुडतुडे मावा आळी याचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात वाढला आहे. जुन्नर तालुक्यामध्ये तूर पिक ठराविकच भागात घेतले जाते. परंतु सध्याच्या रोगाट हवामानामुळे तुर पिकावर अळी तुडतुडा व मावाचे संकट वाढले आहे.

येणेरे, पारुंडे, खिलारवाडी गाढवेवाडी, चिंचोली, वडज धामणखेल या भागामध्ये तुरीचे पीक घेतले जाते. बाजारभाव चांगला मिळत असल्यामुळे आणि भांडवली खर्च कमी लागत असल्याने तसेच उत्पादन मोठ्या प्रमाणात निघत असल्यामुळे सध्या शेतकऱ्यांचा कल तूर पिकाकडे वळाला आहे.

अनेक शेतकरी इतर पिकाला आडोसा म्हणून तुरीची लागवड करतात. त्यातून शेतकऱ्याला दुहेरी फायदा होतो. दुसऱ्या पिकाला आडोसा देखील होतो आणि तुरीचे उत्पादन चांगले येत असल्यामुळे व बाजारभावही चांगला असल्यामुळे शेतकऱ्याला चार पैसे अधिक मिळत असतात. बाजूच्या पिकाला फवारणी करत असताना शेतकरी पूर तूर पिकावर देखील फवारणी करतात. परंतु अळी व तुडतुडे तसेच मावा त्याचा परिणाम मात्र काही कमी होत नाही. काळ्या माव्यामुळे तुरीच्या शेंगा चिकट होतात. त्यामुळे हिरव्या शेंगा बाजारामध्ये विक्री करायला देखील अडचण होते. तसेच तुरीवर आळ्या झाल्यामुळे याचाही परिणाम तूर विक्रीवर होतो.

स्नेहांकुरमुळे माहूर विद्यालय सीसीटीव्हीच्या कक्षेत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सासवड : श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माहूर माध्यमिक विद्यालय माहूर या विद्यालयास पुणे येथील स्नेहांकुर द रे ऑफ होप या संस्थेने २५ हजार रूपये किंमतीच्या दिलेल्या चार सीसीटीव्ही कॅमे-यांमुळे विद्यालयात सीसीटीव्हीच्या कक्षेत आले आहे.

याप्रसंगी स्नेहांकुरच्या अध्यक्षा ॲड. वृषाली दातार यांनी, यामुळे विद्यार्थी विद्यार्थिनींमध्ये एक सुरक्षिततेची भावना त्यामुळे निर्माण होईल. तसेच गुन्हेगारी आणि चुकिचे वागणाऱ्या लोकांच्या हालचाली यामध्ये कैद होतील. विद्यालयाच्या आवारात एखादा छोटासा गुन्हा किंवा दुर्दैवी घटना झाल्यास सीसीटीव्ही यंत्रणेचा उपयोग करून सत्य परिस्थितीचा मागोवा घेण्यासाठी उपयोग होईल तसेच कॅमे-याच्या कक्षेतील संपूर्ण विद्यालयाचा परीसर यामुळे सुरक्षित राहील, असे सांगितले.

याप्रसंगी स्नेहांकूरचे संस्थापक जयप्रकाश दातार, नंदिनी दातार, दत्तात्रय कुलकर्णी, अभिजीत दातार, अद्वैत आपटे यांसह ग्रामस्थ तुकाराम जगताप, योगेश जगताप आदी उपस्थित होते. स्नेहांकुरतर्फे विद्यालयास क्रीडा विज्ञान साहित्य, ग्रीन बोर्ड, अवांतर वाचनीय पुस्तके ई - लर्निंग संच, शैक्षणिक साहित्य इत्यादी प्रकारची मदत मिळाली असल्याचे मुख्याध्यापक हनुमंत पवार यांनी सांगितले.

या मदतीबद्दल स्नेहांकुरचे संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांसह पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. सहशिक्षक रामचंद्र जगताप, लता गायकवाड, विकास राऊत, इंद्रभान पठारे, मंगल जगताप, श्रीकांत खोमणे, राम कुंभार उपस्थित होते. मुख्याध्यापक हनुमान पवार यांनी प्रास्ताविक, महेंद्र भोसले सुत्रसंचलन केले तर पुणे जिल्हा काँग्रेस शिक्षण विभागाचे अध्यक्ष रामप्रभू पेटकर यांनी आभार मानले.

ग्रामीण भागाबरोबर शहरी भागातही मागणी वाढली

पारंपारिक वाजंत्र्यांनाच आले सुगीचे दिवस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

रांजणी : सध्या लग्नसराईची धामधूम सर्वत्र सुरू झाली आहे. या लग्नसराईच्या काळात अलिकडे पारंपारिक वाजंत्र्यांना मोठी मागणी वाढली आहे. ग्रामीण भागाप्रमाणे शहरातून देखील लग्न समारंभ, मिरवणुकांसाठी पारंपारिक वाजंत्र्यानाच पसंती दिसत आहे. यामुळे पारंपरिक वाजंत्र्यांना सध्या सुगीचे दिवस आले आहेत. हलगी, ढोलकी, डफ, ताशा, सनई, या पारंपारिक वाद्यांचे सूर पुन्हा जोरदार घुमू लागले आहेत.

गेल्या चार-पाच वर्षांमध्ये लग्नसमारंभामध्ये पारंपारिकपणा आणला जात आहे. तुळशी विवाह

झाल्यानंतर ग्रामीण भागात लग्न सराईच्या हंगामाला सुरुवात होते. सध्या लग्न समारंभांमध्ये पारंपारिक वाद्ये वाजविणाऱ्या कलाकार मंडळींना सध्या मोठी होत आहे. पाच सात वर्षांपूर्वी डिजिटल साऊंड सिस्टिम, बॅन्जो यामुळे पारंपारिक वाद्यांचे सूर हरपले होते. या वाजंत्री कलाकारांना मागणी होत नव्हती. त्यामुळे या कलाकारांवर अक्षरक्षः उपासमारीची वेळ देखील आली होती.परंतू आता पुन्हा पारंपारिक वाजंत्री मंडळींनाच मागणी वाढली आहे.

ग्रामीण भागातूनच नव्हे तर पुणे, मुंबई, नाशिक सारख्या शहरांमधून देखिल पारंपारिक वाजंत्री कलाकारांना मोठी मागणी होऊ लागली आहे. वाढत्या मागणीमुळे अनेक पारंपारिक वाजंत्र्यांच्या ताफ्यांच्या पुढील दोन-तीन महिन्यांमधिल लग्नतिथी आताच बुक झाल्या आहेत.

पारंपारिक वाजंत्री कमीच असल्याने ते सहज मिळत नाहीत. एका संचात आठ ते दहा जण कलाकार असतात. सध्या एका लग्न समारंभाची बिदागी जवळपास वीस हजार रुपये इतकी आहे. पाच कलाकार असलेले ताफे बारा ते पंधरा हजार रुपये घेतात . तर आठ ते दहा कलाकार असले तर २० ते २२ हजार रुपये घेतात. सध्या पारंपारिक वाजंत्री कलाकारांना सुगीचे दिवस आले आहेत.लग्नसराईच्या चार-पाच महिन्यांमध्ये ते वर्षभराची कमाई करतात.

> सध्या लग्न समारंभांमध्ये पारंपारिक वाद्ये वाजविणारे कलाकार दिसतात. अलीकडे हे कलाकार एकाच रंगाच्या पोशाखात दिसतात. हे कलाकार फेटे, जाकीट परिधान करतात . त्यामुळे ते सर्व वऱ्हाडी मंडळींचे, पै पाहुण्यांचे लक्ष वेधून घेतात. पारंपारिक वाद्यांची जुगलबंदी ते सादर करतात. जुनी, नवीन गाणी, पोवाडे, गवळणी, लावण्या वाजवून ते वाहवा मिळवितात. त्यांच्यामुळे लग्न समारंभांची शोभा निश्चितच वाढते.
>
> **-पमाजी पंचरास,**
> शिवशंभो वाजंत्री मंडळ, लोणी धामणी

मानसी

● फॅशन ● किचन ● गृहसजावट ● सहजीवन ● टिप्स

■ सेलीब्रेटी कॉर्नर

संघर्षाला यश

मराठमोळी अभिनेत्री छाया कदम या सध्या प्रसिद्धीच्या झोतात आहेत. जागतिक स्तरावर पोहचलेल्या छाया यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. याचे कारण म्हणजे त्यांच्या 'ऑल वुई इमॅजिन ॲज लाइट' ला ८२ व्या वार्षिक गोल्डन ग्लोब अवॉर्ड्समध्ये दोन नामांकने मिळाली आहेत. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (मोशन पिक्चर) हे पहिले नामांकन तर, दुसरा नामांकन सर्वोत्कृष्ट मोशन पिक्चर (इंग्रजी नसलेली भाषा) या श्रेणीसाठी मिळाले आहे. या श्रेणीमध्ये भारतीय दिग्दर्शकाचे नामांकन होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

छाया कदम यांची मुख्य भूमिका असणाऱ्या या चित्रपटाचा प्रीमियर २३ मे २०२४ रोजी कान्स चित्रपट महोत्सवात झाला होता. काही दिवसापूर्वी 'ऑल वुई इमॅजिन ॲज लाइट' या चित्रपटाला न्यूयॉर्क फिल्म क्रिटिक्स सर्कलमध्ये सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आहे.

याबाबत छाया कदम म्हणाल्या की, गोल्डन ग्लोब नामांकन हे माझ्यासाठी आणि संपूर्ण टीमसाठी अभिमानाचा क्षण आहे. भारतीय सिनेमा जागतिक स्तरावर पोहोचत आहे, याचा आनंद वाटतो. हा चित्रपट माझ्या हृदयाच्या जवळ आहे. तो मानवी भावना, संघर्ष आणि प्रकाशाच्या शोधाबद्दल आहे.

पुढे त्या म्हणाल्या, माझ्या सहकाऱ्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे हे यश शक्य झालं. या नामांकनाने आम्हाला पुढे आणखी उत्तम काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे. प्रेक्षकांनी दाखवलेल्या प्रेमासाठी आणि पाठिंब्यासाठी मी मनःपूर्वक आभारी आहे, असे म्हणत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. 'ऑल वी इमॅजिन ॲज लाईट'मध्ये छाया कदम, कानू कुसरुती, दिव्या प्रभा आणि यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

सिनेमातल्या भूमिकेची लांबी लहान असली तरी छाया यांनी सादरीकरणानं आजवर प्रत्येक सिनेमात स्वतःची छाप सोडली आहे.'झुंड' असो किंवा 'लापता लेडीज' असो किंवा 'मडगाव एक्सप्रेस'मधील विनादी भूमिका, त्यांच्या प्रत्येक भूमिकेचं कौतुक झालं आहे.

मुंबईतल्या कलिनामध्ये मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या छाया यांचे वडील गिरणी कामगार होते. बारावीत एकदा नापास झाल्यावरही न खचता त्यांनी टेक्सटाइल डिझाइनची पदवी मिळविली आणि राज्यस्तरावर कबड्डीही खेळली. वामन केंद्रे यांच्या 'झुलवा' नाटकासह 'फात्याचं पाणी', 'विठ्ठल' आणि 'दगडांचा देव' अशा लघुपटांमध्येही भूमिका साकारल्या. पुढं चित्रपटात संधी मिळाली आणि आता थेट जागतिक स्तरावर त्यांचं नाव पोहोचलं आहे. ●●●

चौदा वर्षे हा वयोगट म्हणजे किशोरवयीन टप्पा. सधन कुटुंबातील मुलांसाठी तर हे वय खेळण्याचे आणि बागडण्याचे. पण या वयात कष्ट करणारी मुले वेळेचा सदुपयोग करतात आणि कालांतराने इतिहास घडवितात. हेच नामीबियाच्या ७२ वर्षीय नेतुंबो यांनी करून दाखविले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे वेड उराशी बाळगत तरुणपणात चळवळीत सहभाग घेतला आणि श्वेतवर्णियांच्या तावडीतून देशाला मुक्तता मिळवून देण्यासाठी मोलाची कामगिरी बजावली. नेतुंबो यांनी खरोखरच इतिहास घडविला आहे. नामीबियाच्या इतिहासात नेतुबो या पहिल्या महिला अध्यक्ष झाल्या असून तत्पूर्वी त्या उपाध्यक्ष होत्या.

नामीबियाच्या भाग्यविधात्या

२०२४ वर्ष संपण्यास काही दिवस राहिलेले असताना अचानक नामीबियाच्या पदरात असे काही यश पडले की तेथील जनता आणि इतिहास कधीही विसरू शकणार नाही. जगातील निम्मी लोकसंख्या देखील या घटनेकडे दुर्लक्ष करणार नाही. 'एनएनएन'च्या नावाने प्रसिद्ध असलेल्या ७२ वर्षीय नेतुंबो नंदी नदैतवाह यांनी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात ५७ टक्के मते मिळवून नामीबियाच्या पहिल्या महिला अध्यक्ष होण्याचा मान मिळवला. आर्थिक आणि सामाजिक पातळीवर पिछाडीवर असलेल्या नामीबियासारख्या देशात नेतुंबो यांची झेप प्रेरणादायी आहेच, त्याचबरोबर आफ्रिका खंडातील महिलांचा आत्मविश्वास द्विगुणीत करणारीही आहे.

तेरा भावंडांत नववे अपत्य म्हणून १९५२ मध्ये नेतुंबो यांचा जन्म झाला. तत्कालिन काळात नामीबिया दक्षिण पश्चिम आफ्रिकाच्या रुपातून ओळखला जात होता आणि दक्षिण आफ्रिकेची राजवट होती. नेतुंबो यांचे वडिल पाद्री होते आणि त्यामुळे त्यांच्या शिक्षणात कोणतिही अडचण आली नाही. गावात सेंटर मेरी मिशन स्कूलमध्ये त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. दहावीच्या उंबरठ्यावर असताना त्यांच्या विचारात प्रगल्भता आली आणि तत्कालिन काळातील सामाजिक वातावरणातील भेदाभेद जाणवू लागला. अल्पसंख्याक श्वेतवर्णियांचे कृष्णवर्णियावरचे राज्य केवळ चुकीचे नसून ती एकप्रकारे गुलामगिरी होती, हे लक्षात येऊ लागले. तत्कालिन काळात दक्षिण पश्चिम आफ्रिका पिपल्स ऑर्गेनायजेशन (स्वापो) संघटना ही श्वेतवर्णियांच्या शासनाविरोधात आंदोलन करत होती. या संघटनेकडून स्वातंत्र्याची मागणी होऊ लागली होती.

अर्थात नेतुंबो यांना शास्त्रज्ञ होण्याची इच्छा होती. परंतु पारतंत्र्यांच्या वेदना एवढ्या त्रासदायक ठरत होत्या की त्यांनी स्वत:च्या स्वप्नांना तिलांजली देत स्वापो संघटनेत सामील होण्याचा निर्णय घेतला. स्वातंत्र्याप्रती त्यांचे ध्येय पाहून पक्षांनी त्याला युवा शाखेचे नेतेपद दिले. शासनकत्यांसाठी या गोष्टी पचनी पडणाऱ्या नव्हत्या. स्वापो कार्यकर्त्यांवर दडपशाही करताना त्यांच्या वरवंट्याखाली नेतुंबा देखील आल्या. त्यांना पहिल्यांदा तुरुंगात टाकले तेव्हा त्या माध्यमिक शाळेत होत्या.त्यांच्या अटकेने स्वातंत्र्य मिळवण्याच्या विचाराला आणखीच धार आली. परंतु नेतुंबो आता सत्ताधाऱ्यांच्या रडारवर होत्या.

देशात राहिल्यास सातत्याने छळ होईल, याची जाणीव त्यांना झाली. त्यामुळे तुरुंगातून बाहेर येताच त्यांनी शेजारी देशात राहून संघटनेचे काम करण्याचा निर्णय घेतला. १९७४ मध्ये त्या दक्षिण पश्चिम आफ्रिकेतून पलायन करत झांबियाची राजधानी लुसाका येथे पोचल्या. लुसाका येथे अगोदरच स्वापो संघटनेचे कार्यकर्ते सक्रिय होते. तेथे अनेक कार्यालय देखील होते. पुढील दोन वर्षे नेतुंबो यांनी तेथूनच स्वापो संघटनेसाठी सक्रियतेने काम केले. यादरम्यान त्यांना तत्कालिन सोव्हिएत संघाच्या लेनीन हायर स्कूल येथे डिप्लोमा करण्याची संधी मिळाली. त्यानंतर पक्षाने त्यांच्यावर टांझानिया येथे नवीन जबाबदारी सोपविली. संघटन आणि शिक्षणाचे काम एकाचवेळी सुरू होते.

नेतुंबो यांना देशात उच्चशिक्षित तरुण असणे गरजेचे वाटत होते. स्वातंत्र्यानंतर देशाचा कारभार चालविण्यासाठी सजगता बाळगण्याबरोबरच व्यवस्थाही हाताळू शकेल, अशा लोकांची गरज भासणार होती. अर्थात नामीबियाची स्थिती पाहता तेथील तरुणाईला तात्काळ देशाबाहेर पडणे शक्य नव्हते. परंतु नेतुंबो यांनी देशाबाहेर राहून देशहितासाठी आवश्यक असणारे शिक्षण आत्मसात केले.१९८७ मध्ये ब्रिटनच्या ग्लासगो कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी येथे लोक प्रशासन आणि व्यवस्थापनात पदव्युत्तर पदवी करण्याची संधी मिळाली तेव्हा त्यासाठी त्यांनी क्षणही दवडला नाही. नेतुंबो यांनी कष्टाने अभ्यास केला आणि त्याचा परिणाम म्हणजे ब्रिटनमध्येच आणखी एका विद्यापीठात त्यांना आंतरराष्ट्रीय संबंध या विषयात पदवी प्राप्त करण्याची संधी मिळाली.

देश सोडून चौदा वर्षे झाली होती. स्वापोच्या आंदोलनाने दक्षिण आफ्रिकेच्या पीटर बोथा सरकारला झुकण्यास भाग पाडले. १९८८ मध्ये अखेर तो 'सुदिन' उजाडला आणि दक्षिण आफ्रिकेने संयुक्त राष्ट्राच्या देखरेखीखाली नामीबियाला स्वातंत्र्य देण्याचा निर्णय घेतला.

१९८९ मध्ये नेतुंबो मायदेशी परतल्या. सत्ता हस्तांतराचे काम गुंतागुंतीचे राहिले. कारण नामीबियात श्वेतवर्णियांनी केलेली गुंतवणूक ही अडचणीची ठरू लागली. शेवटी संयुक्त राष्ट्राच्या देखरेखाली प्रश्न सोडविले गेले आणि सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. स्वापो यांना ५७ टक्के मते मिळाली आणि ६० टक्के जागांवर यश मिळवले. सॅम नुजोमा यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

२१ मार्च १९९० मध्ये नॅशनल स्टेडियम येथे दक्षिण आफ्रिकेचा झेंडा उतरवून नामीबियाचा झेंडा फडकावला तेव्हा ३८ वर्षीय नेतुंबो यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लगाले. आंतराष्ट्रीय संबंध विषयातील सखोल अभ्यास पाहता अध्यक्षांनी त्यांना परराष्ट्र उप मंत्री म्हणून नियुक्त केले. १९९६ पर्यंत नेतुंबो यांनी जगातील मोठ्या देशांसमवेत नामीबियाचे संबंध चांगले ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांना महिला आणि बाल कल्याण, पर्यटन, माहिती खात्याचे मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली.महिलांच्या हक्कांसाठी नेतुंबो यांचा एवढा दबदबा राहिला की, एखादा सहकारी मंत्री महिलांविषयी काही बोलत असेल तर सार्वजनिक ठिकाणी त्यांच्यावर ताशेरे ओढताना त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.

२००२ मध्ये कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा आणताना त्यांची मोठी भूमिका राहिली आहे. अमेरिकेसारख्या विकसित लोकशाही देशांतही महिलांसाठी राजकारणात स्थिरस्थावर होणे किती कठीण आहे हे आपल्याला हिलरी क्लिंटन आणि कमला हॅरिस यांच्या उदाहरणातून समजू शकते. अशावेळी नेतुंबो नंदी नदैतवाह यांनी अनेक दशकांपासून नामीबियाच्या सत्तेत असणे आणि आता देशातील उच्च पद मिळवणे ही साधारण बाब नाही. पुरुषसत्ताक समाजात महिलांना स्थान मिळवून देण्याचे हे अनोखे उदाहरण म्हणावे लागेल. ●●●

पाहुण्यांची खातीरदारी करताना...

पुरी आलेल्या पाहुण्यांना भोजन वाढताना काही गोष्टींची काळजी घेणं आवश्यक आहे. ती घेतली तर घरी आलेला पाहुणा प्रसन्न चित्ताने आपल्या घरी जाईल.

■ आपल्या संस्कृतीत अतिथींना देवाप्रमाणे मानले आहे. घरी आलेला पाहुणा संतुष्ट होऊनच घरातून गेला पाहिजे असा एक नियम आपल्याकडे आहे. पाहुण्यांच्या संतुष्टी बरोबरच घरातील स्त्रीचाही नेटकेपणा, गृहीणीपणाचे कौशल्य दिसले पाहीजे. बरेचदा आपण पाहुण्यांना जेवणासाठी आमंत्रित करतो. त्यांना भोजन वाढताना थोडी काळजी आणि सतर्कता ठेवावी.

■ जेवणाऱ्याला वाढण्याची आणि खाऊ घालण्याची पध्दत इतकी आवडली पाहिजे की तो खुश झाला पाहिजे. त्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

■ जेवणाचे पदार्थ तयार झाल्यानंतर ते अशा भांड्यामध्ये ठेवावे, जी भांडी डायनिंग टेबलाची शोभा वाढवतात. काळी खराब भांडी वाढताना वापरू नये. भात, पुलाव, दहीवडा इत्यादी पदार्थ प्लेटमध्ये तर भाज्या वाटीत ठेवाव्यात.

■ आधी सर्व पदार्थ टेबलवर मांडून ठेवावे, मगच पानात वाढावे. क्रॉकरीमध्ये फुल प्लेट, क्वार्टर प्लेट, खोल प्लेट, टेबलस्पून, टी स्पून, काटे-सुरी इत्यादी पाहुण्यांच्या संख्येनुसार टेबलवर रचून ठेवावेत. पदार्थानुसार लहान-मोठ्या चमच्यांचा वापर करावा.

■ सुरुवातीलाच पाणी भरलेला ग्लास प्रत्येकाच्या उजव्या हाताजवळ ठेवावा. नंतर एका बाजूला पाण्याने भरलेले जग ठेवावे. म्हणजे गरजेनुसार ते देता येईल.

मुलांना वाढताना विशेष लक्ष द्यावे. मुले स्वत:च आपले जेवण वाढून घेत असतील तर ती खूप जास्त वाढून घेत नाहीत ना, याकडे लक्ष दयावे.

■ शक्यतो मुलांना आपणच जेवण वाढून दयावे. सर्व पदार्थ टेबलावर ठेवल्यानंतर तुम्हाला आवडेल तो पदार्थ अवश्य घ्या असा आग्रह पाहुण्यांना करावा. यामुळे अन्न वाया जात नाही. उगाच भरमसाठ अन्न वाढून घेऊ नये. जेवतांना वाद-विवादाचे प्रसंग पूर्णपणे टाळावे. पाहुण्यांना कोणत्याही गोष्टीची कमतरता जाणवणार नाही याची काळजी अवश्य घ्यावी.

■ जेवण संपल्यानंतर काही गोड पदार्थ टेबलावर अवश्य ठेवा. जेवणानंतर हात धुण्यासाठी, साबण, पाणी आणि टॉवेल तयार ठेवावा. गोडानंतर मुखशुध्दी म्हणून शेवटी बडीशेप, वेलची, लवंग, पान यापैकी काहीतरी ठेवावे. म्हणजे परिपूर्ण जेवणाचा आनंद मिळेल आणि पाहुणे समाधानाने घरी जातील. ●●●

एव्हरग्रीन बांधणीची साडी

भारदस्त व कलाकुसरीने परिपूर्ण असलेल्या बांधणीची साडीने आजच्या आधुनिक फॅशनच्या युगात आपला ठसा उमटवला आहे.

बांधणी हा प्रकार गुजरात आणि राजस्थानमध्ये मुख्यत्वे तयार केला जातो. टाय ॲण्ड डाय पद्धतीचा अवलंब करून कापडाची रंगाई केली जाते. या तंत्राने रंगवले जाणारे कापड धाग्याने घट्टपणे अनेक ठिकाणी बांधले जाते आणि त्याच बांधलेल्या अवस्थेत त्याची रंगाई केली जाते. त्यामुळे 'बांधणी' ही अतिशय कौशल्याने काम करावी लागणारी पद्धत आहे.

गुजरात राज्यातील कच्छ प्रदेशातील भूज आणि मांडवी जिल्ह्यात भारतभरातील सर्वात चांगले बांधणीकाम होते, अशी ख्याती आहे. गुजरात राज्यातील सौराष्ट्र भागात बांधणीचे काम होते, पण कच्छमधील बांधणीपेक्षा ते वेगळ्या प्रकारे होते. राजस्थान प्रांतातसुद्धा बांधणीकाम केले जाते पण त्यामध्ये वापरले जाणारे डिझाइन आणि रंग कच्छ, सौराष्ट्रपेक्षा पूर्णपणे वेगळे असतात.

बांधणी किंवा बंधेजमध्ये पॅटर्नची रेलचेल असते. साडय़ांप्रमाणेच कुर्ता, सलवार, खमीज आणि चणिया-चोळीकरिता बांधणीचा वापर केला जातो. पूर्वी गुजरात, राजस्थानमध्ये सीमित असलेली बांधणीची मागणी आता भारतभर पसरलेली आहे.

अलीकडे साडीची जागा स्कर्ट मिडी, जिन्स, पंजाबी ड्रेस, लेगींग्जने घेतली असली तर पारंपरिक पध्दतीने तयार करण्यात आलेल्या साडीचे महत्व आजाही कायम आहे. रेशीम धागा, रंग व त्याला लागणाऱ्या वस्तुंच्या दिवसेंदिवस किंमती वाढत असल्याने बांधणी साडी व्यसायावर संक्रांतआली आहे. आधुनिक पध्दतीची बांधणी साडी आता विविध रंगात आणि डिझाईनमध्ये बाजाारात अवतरली आहे. पूर्वी केवळ दोन रंग आणि कमळाचे फूल किंवा पदके यातूनच बांधणीची साडी तयार केलीजायची. लाल आणि काळ्या रंगातील बांधणीची साडी अनेकांना आकर्षित करत होती. विशेषत: बांधणीची साडी सर्वाधिक गुजरात आणि राजस्थानमध्ये अधिक लोकप्रिय आहे.

बांधणीच्या साडीत वापरण्यात येणारे रेशीम धागे आणि स्पॉट स्वरुपात केलेले डिझाईन अत्यंत सुंदर दिसते. बांधणीची साडी विशिष्ट धार्मिकसोहळ्यामध्ये हमखास नेसण्याची प्रथा आहे. बांधणीची साडी नऊ आणि सहा मीटरमध्ये उपलब्ध असते. पूर्वी केवळकापसाच्या धाग्यापासून बांधणीची साडी तयार होत. आता रेशीम आणि कृत्रिम धागे वापरुनदेखील साडी बांधणी स्वरुपात उपलब्ध असते. हलक्या रंगाबरोबरच गडद रंगाचे कॉंबिनेशन हे या साडीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

बहरलेलं फॅशनविश्व

फॅशनेबल कपडे घालायला आपल्याला सगळ्यांनाच आवडते. आजची पिढी तर कपड्यांच्या बाबतीत प्रचंड सजग आहे. ऑफिसला जाताना, मित्रमैत्रिणींसोबत लंचला अथवा डिनरला जाताना, पार्टीला जाताना, पिकनिकला जाताना असे वेगवेगळ्या प्रकारचे कपडे आजकाल प्रत्येकाच्या वॉर्डरोबमध्ये पाहायला मिळतात. इतकेच नव्हे तर फिरायला जाताना कोणत्या दिवशी कोणते कपडे घालयचे, कोणता ट्रेंड फॉलो करायचा याविषयी विचार केला जातो. फिरायला जाताना मोठ्या आकाराचे शर्ट, वन पिस याची निवड करू शकता. तसेच वेगवेगळ्या रंगाची प्रिंट असलेल्या कपड्यांना देखील तुम्ही प्राधान्य देऊ शकता. हे कपडे तुमच्या सौंदर्यात आणखी भर घालतील.

अम्ब्रेला घेर असलेला वन पीस, लूज पॅटर्न शॉर्ट कुर्ता कोणत्याही महिलेवर उठून दिसतो. छान प्रिंट असलेले सैल वन पीस, पँट याची देखील नक्कीच शॉपिंग करा.

सध्या फुलांच्या डिझाईनची चलती आहे. विविध आकाराची फुले असलेले डिझाइन आपल्याला कपड्यांवर, शूजवर, बॅगवर देखील पाहायला मिळतात. एवढेच नव्हे तर फुलांच्या डिझाईनचे कानातले, अंगठ्या, गळ्यातले याला देखील चांगलीच मागणी आहे. सध्या टॅंक टॉपची क्रेझ पाहायला मिळत आहे. एवढेच नव्हे तर हे दोघेही कार्गो पँटच्या प्रेमात पडल्याचे आपल्याला दिसून येते. कॅज्युअलमध्ये कार्गो पँट, लो राईज ट्राऊजर, युटिलिटी जीन्स यांना सध्या चांगलीच पसंती आहे. सध्या फॅशनजगतात क्रॉप्ट जॅकेटची चलती आपल्याला पाहायला मिळत आहे. दुकानांपेक्षा सध्या जॅकेट्स खरेदीसाठी ग्राहकांकडून ॲमेझॉनला जास्त पसंती मिळाल्याचे चित्र आहे.

स्कर्टमध्ये आपल्याला सध्या विविध प्रकार पाहायला मिळत आहेत. ऑफिसला जाणाऱ्या महिला ब्लेझरसोबतच टाईट स्कर्टला देखील पसंती देताना दिसत आहेत. तसेच एखाद्या डिनर पार्टीला जाताना अथवा एखाद्या समुद्रकिनारी फेरफटका मारायला जात असताना तुम्ही व्रॅप स्कर्टचा विचार करू शकता. या स्कर्टवर एखादा डिझायनर टी-शर्ट घातला तर तुमचा लूक खूपच छान दिसतो. तसेच स्कर्टमध्ये मॅचिंग सेट हा देखील प्रकार आपल्याला पाहायला मिळतो. यात स्कर्ट आणि स्कर्टवरील टी-शर्ट याचा रंग आणि डिझाईन अगदीच सारखे असते.

शूज, बॅग्स, ज्वेलरी या ॲक्सेसरीज आपला लुक पूर्ण करण्यासाठी गरजेच्या आहेत. कोणत्या ड्रेसवरकधी, कुठली ॲक्सेसरीज घालायची याबद्दल कित्येकांच्या मनामध्ये शंका असतात. कपड्यांपासून बनवलेल्या अथवा सॉफ्ट फरपासून बनवलेल्या पर्स सगळ्याच कपड्यांसोबत खूपच छान दिसतात. तसेच तुम्ही गॉगल घ्यायचा विचार करत असाल तर स्लिम शेड्स, शिल्ड शेड्सचा विचार करा. ●●●

मराठवाड्यातील राणी लक्ष्मीबाई

मराठवाडा हा भाग स्वातंत्र्यपूर्व काळात हैदराबादच्या निजामाच्या अखत्यारीत येत होता. देशात इतरत्र लोक परकीयांविरूद्ध लढत असताना मराठवाड्यातील जनतेला स्वकीयांच्या अत्याचाराला तोंड द्यावे लागत होते. स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ या स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाड्यातील जनतेत त्या विरूद्ध जागृती निर्माण केली. त्या लढ्यात ग्रामीण भागातील एक अतिशय धाडसी महिला सहभागी झाली होती. तिचे नाव होते दगडाबाई देवराव शेळके. त्यांना मराठवाड्याची राणी लक्ष्मीबाई म्हणूनही ओळखले जाते .

जालना जिल्ह्याच्या भोकरदन तालुक्यातील कोलते टाकळी हे छोटेसे खेडे म्हणजे दगडाबाई यांचे मूळ गाव ! त्यांचे सासर जालना शहरापासून पंधरा-सोळा मैलांवर असलेल्या बदनापूरजवळील धोपटेश्वर येथे होते. दगडाबाई या मुळातच धाडसी स्वभावाच्या होत्या. त्यात त्यांना स्वातंत्र्य लढ्याची जाणीव झाली. त्यांनी तशी जागृती महिलांमध्ये केली. त्यांनी निजामाची सत्ता ही देशविरोधी आहे, त्यामुळे त्यांच्याविरूद्ध लढणे म्हणजे स्वातंत्र्यसंग्रामच आहे ही गोष्ट महिलांना समजावून सांगितली. निजामाच्या शिपायांना रझाकार म्हटले जाई. रझाकार हे शस्त्रसज्ज असत, त्यामुळे त्यांच्याविरूद्ध लढताना शस्त्रांचा वापर केला पाहिजे हे दगडाबाई यांनी ओळखले. त्यांनी देऊळगावराजा येथील एका कॅम्पवर जाऊन आधुनिक शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षण घेतले.

दगडाबाई इतक्या धाडसी होत्या रात्री-अपरात्री गावोगाव प्रवास करत व स्वातंत्र्यसैनिकांना मदत करत. दगडाबाईंसोबत संपत भिल्ल, बाबुराव जाधव, लाला लक्ष्मीनारायण हे लोक होते. त्या सर्वांनी निजामाच्या पोलिस चौक्या जाळणे, अत्याचार करणाऱ्या रझाकारांना प्रत्युत्तर देणे अशी कामे केली. एकदा तर दगडाबाईंनी कोलते टाकळीच्या त्यांच्या गावात असलेल्या रझाकारांच्या छावणीवर हल्ला केला व तेथील शिपायांना ठार केले. त्या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली. लोक दगडाबाई यांना 'मर्दानी दगडाबाई' म्हणू लागले. एकदा, निजाम सरकारच्या सैनिकांनी त्यांना शस्त्रांसह रंगेहाथ पकडले होते. त्यामुळे त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला होता. . त्या खांद्यावर मोठी रायफल, खिशात पिस्तुल, प्रसंगी आणीबाणीची परिस्थिती उद्भवली तर बॉंब अशा शस्त्रांनिशी सज्ज असत.

हसनाबाद गावात एकदा दंगल उसळली होती. गावकरी व रझाकार यांच्यात धुमश्चक्री सुरू होती. तेव्हा दगडाबाई यांनी बरेच मोठे अंतर पोटावर रांगत जाऊन रझाकारांची छावणी गाठली व तेथे गोळीबार केला, त्यात काही रझाकार ठार झाले. रझाकारांनी संपूर्ण हसनाबाद गावाची नाकेबंदी केली, तेव्हा कोणीच पुढे जाण्यास तयार नव्हते. लोकांना त्यांचा मृत्यू समोर दिसत होता. दगडाबाई त्यावेळी मागे हटल्या नाहीत, त्यांनी एकटीने पुन्हा एकदा रझाकारांची छावणी गाठली व त्यावर हातबॉंब टाकले. अवघ्या अठरा-वीस वर्षांच्या तरुणीचे ते शौर्य सर्वांनाच चकित करणारे ठरले.

स्वातंत्र्यानंतर दगडाबाईंनी स्वत:ला समाजकार्यात झोकून दिले. दगडाबाईंच्या त्या अतुलनीय शौर्याची दखल केंद्र सरकारने घेतली. त्यांचा पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी मोठा सत्कार केला. त्या चांदवड येथील 'शेतकरी महिला मेळाव्या'च्या अध्यक्ष होत्या. ५ मे २०१३ रोजी वयाच्या अठ्ठ्याण्णवव्या वर्षी दगडाबाईंचा मृत्यू झाला. ●●●

विमा सखी योजनेच्या अंतरंगात...

राज्ये आणि केंद्राकडून अलीकडील काळात महिलाकेंद्री योजनांची बरसात होत आहे. अलीकडेच पंतप्रधान मोदींनी विमा सखी योजना जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत १००,००० विमा सखींचा समावेश करण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण महिला विमा एजंट बनू शकणार आहेत. एलआयसीच्या या योजनेचा उद्देश महिलांना सक्षम करणे व त्यांना रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे.

या योजनेत समाविष्ट असलेल्या सखींना पहिल्या तीन वर्षांत निश्चित स्टायपेंड दिला जाईल. पहिल्या वर्षी महिलांना दरमहा ७,००० रुपये मिळतील, त्यानंतर दुसऱ्या वर्षी ही रक्कम वाढून ६,००० रुपये होईल. त्याचप्रमाणे तिसऱ्या वर्षी ही रक्कम ५,००० रुपये होईल. जर एखाद्या महिलेने टार्गेट पूर्ण केले तर तिला अतिरिक्त कमिशन देखील मिळेल.

महिलांना या योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर संबंधित महिलेचे कमीत कमी इयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झालेले असायला हवे. तसेच महिलेचे वय कमीत कमी १७ आणि जास्तीत जास्त ७० वर्षे असायला हवे. तीन वर्षांचं ट्रेनिंग पूर्ण झाल्यावर महिलांना विमा एजंट म्हणून काम करता येईल. ●●●

पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार प्रवास

दिल्ली-श्रीनगर थेट रेल्वेसेवा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : काश्मीर खोरे सर्व हवामानात उर्वरित भारताशी जोडून ठेवण्यासाठी सरकार बऱ् याच काळापासून कनेक्टिव्हिटीवर काम करत आहे. या दिशेने नव्या वर्षात देशाला एक मोठी भेट मिळणार आहे. भारतीय रेल्वेसाठीही हा मैलाचा दगड मानला जात आहे. वास्तविक, दिल्ली ते श्रीनगर ला थेट जोडणारा रेल्वे मार्ग जानेवारीत सुरू होणार आहे. वंदे भारत एक्स्प्रेससारख्या लक्झरी गाड्याही या मार्गावर धावणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्या वंदे भारत एक्स्प्रेसने दिल्ली ते श्रीनगर प्रवास करणार आहेत. उद्घाटनाच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी रेल्वेतून प्रवास करतील. यासंदर्भात सध्या चाचणी सुरू आहे. उत्तर रेल्वेचे मुख्य प्रवक्ते हिमांशू शेखर उपाध्याय यांनी याबाबत माहिती दिली आहे.

कटरा ते रियासी दरम्यान १७ किलोमीटरच्या मार्गाचे काम सुरू आहे. इंजिन, बिघाड यांनी भरलेली मालगाडी चाचणीअंतर्गत या मार्गावर चालविली जात आहे. अंजी नदीवरही ती चालवली जात आहे. १५ जानेवारीपूर्वी उत्तर परिमंडळाच्या सुरक्षा आयुक्तांकडून अंतिम चाचणी घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. उपाध्याय म्हणाले की, कटरा ते रियासी दरम्यानच्या १७ किमी च्या विभागाचे काम पूर्ण झाले आहे. ही प्रक्रिया वेगाने सुरू होती, ती हाताळण्यात आली आहे. याशिवाय येथे टी-३३ बोगद्याचे बांधकाम करणे सर्वात अवघड होते. तेही आता पूर्ण झाले आहे.

सेफ्टी ऑडिटमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्या ही दूर करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे रेल्वेच्या प्रवक्त्याने सांगितले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच एखाद्या प्रकल्पाच्या माध्यमातून काश्मीर उर्वरित भारताशी सर्व हवामानात जोडले जाणार आहे. रियासी-कटरा या १७ किलोमीटरच्या मार्गामुळे हे होणार आहे. हे काम गुंतागुंतीचे असले तरी भारतीय रेल्वेने ते सिद्ध केले आहे. काश्मीरच्या जनतेसाठीही हा गेम चेंजर ठरेल, असे ते म्हणाले.

पर्यटकांची संख्या वाढणार

● रेल्वेचे भाडे विमान तिकिटांपेक्षा खूपच कमी आहे. त्यामुळे पर्यटकांची संख्या वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जाऊ शकते. ११८ किलोमीटर लांबीचा काझीगुंड-बारामुल्ला हा मार्ग २००९ मध्ये सुरू करण्यात आला. त्यानंतर जून २०१३ मध्ये बनिहाल काझीगुंड विभाग सुरू करण्यात आला. जुलै २०१४ मध्ये उधमपूर-कटरा या २५ किलोमीटरच्या प्रवासाला सुरुवात झाली. याच वर्षी फेब्रुवारीमहिन्यात बनिहाल आणि सांगलदान रेल्वे स्थानकांदरम्यान इलेक्ट्रिक ट्रेनची चाचणी घेण्यात आली होती. २००५-०६ मध्ये उधमपूर, श्रीनगर आणि बारामुल्ला दरम्यान रेल्वे मार्गाचे काम सुरू झाले. या प्रकल्पाच्या मार्गावर एकूण ३८ बोगदे असून त्यापैकी टी-४९ ची लांबी १२.७५ किमी आहे. देशाच्या रेल्वे नेटवर्कमधील हा सर्वात लांब बोगदा आहे. या संपूर्ण प्रकल्पात एकूण ९२७ पूल बांधण्यात आले आहेत.

नवीन वर्षाच्या स्वागताला चोख बंदोबस्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : नवीन वर्षाच्या स्वागतवेळी पोलिसांचा चोख बंदोबस्त राहणार आहे. ८ अपर पोलिस आयुक्त, २९ पोलिस उपायुक्त, ५३ सहाय्यक पोलिस आयुक्त, २,१८४ पोलिस अधिकारी आणि १२ हजार ४८ पोलिस अंमलदार गस्तीवर असणार आहेत, अशी माहिती राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली. शहरातील महत्वांच्या चौकात नाकाबंदी ठेवली जाणार असल्याचे कदम म्हणाले.

मुंबई पोलीस सक्षम आहेत. जगातील सुरक्षित शहर म्हणून मुंबईची ओळख आहे. ती प्रतिमा पोलिस कायम ठेवतील हा विश्वास असल्याचे योगेश कदम म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी पोलिस प्रशासनला सुरक्षेबाबत सूचना दिलेल्या आहेत. नव वर्षाच्या सुरक्षेसाठी १२ हजार पोलीस असतील तसेच महिला पोलिसही आहेत, असे कदम म्हणाले. नव वर्षाच्या स्वागतासाठी मुंबईकरांनी कोणतेही दडपण बाळगू नये. पोलीस आपल्या सुरक्षेसाठी तयार असल्याचे कदम म्हणाले.

ड्रग्जबाबतचा विळखा एका दिवसात संपणार नाही असे कदम म्हणाले. ड्रग्जचं सेवन खासगी पार्टीत मोठ्या प्रमाणात होतं आहे, त्यावर विशेष लक्ष ठेवले जाणार असल्याचे कदम म्हणाले.

ड्रग्ज पार्टींवर कडक कारवाई होणार आहे. १ ग्रॅम असो की त्याहून अधिक कारवाई होणारचं असे कदम म्हणाले. विकणारा आणि विकत घेणारा या दोघांवरही कारवाई होणार असल्याचे कदम म्हणाले.

मद्यपान करुन गाडी चालवणाऱ्यांविरोधात विशेष मोहिम सुरू राहणार आहे. सर्वच जबाबदारी पोलिसांवर टाकून चालणार नाही. नागरिकांनाही जबाबदारीने वागलं पाहिजे, असे रेव्ह पार्टी किंवा इतर गुप्त पार्टींवर एटीसी व अंमली पदार्थ विभागाचे पोलिस लक्ष ठेवून राहतील, असे त्यांनी सांगितले.

भारताला अंतर्गत धोक्यांची भीती: राजनाथसिंह यांचे प्रतिपादन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : भारत हा तसा फार सुदैवी देश नाही. देशाला बाहेरून धोके आहेतच, आतूनही धोके आहेत; पण आम्हीही स्वस्थ बसणार नाही. लढवय्ये आहोत. हे सारे धोके निपटून काढू, असे ठाम प्रतिपादन केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी रविवारी येथे केले. या धोक्याला तोंड देण्यासाठी जवानांनी चोवीस तास सतर्क राहावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

सीमेवर आम्हाला सतत लढावे लागते आणि सीमेच्या आतही लढावे लागते. दोन्हीकडे धोके आहेत. लष्करातील प्रत्येक जवानाने त्यामुळे प्रत्येक क्षणाला अलर्ट राहायला हवे. सीमेवर व देशात शत्रू कोणत्या क्षणाला घात करेल सांगता येत नाही, असा इशाराही सिंह यांनी दिला.

मध्य प्रदेशातील महू कँटोनमेंटमधील लष्करी विद्यालयात जवानांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाहिले तर भारताच्या नशिबी अत्यंत वाईट असे शेजारी लिहिले गेलेले आहेत. उत्तरेकडे, पश्चिमेकडे सीमेवर प्रत्येक क्षण धोक्याच असतो. पूर्वेकडेही परिस्थिती आता अशीच बदलेल की काय, ही शंका आहे. या सगळ्या आघाड्यांवर मुकाबला करत असताना अनेक प्रसंगांतून आम्हाला अंतर्गत मोर्चेही सांभाळावे लागतात, हे मोठे दुर्दैव आहे. आमचे शत्रू मग ते बाह्य असोत वा अंतर्गत, नेहमी सक्रिय असतात. त्यामुळे आपली नजर त्यांच्यावर सतत असली पाहिजे. ते केव्हा काय करणार आहेत, हे आपल्याला आधीच माहित झाले पाहिजे.

ओमर अब्दुल्ला यांना धक्का

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

श्रीनगर : जम्मू-काश्मीरमध्ये सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्स आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांना मोठा धक्का बसला आहे. उमर अब्दुल्ला यांचे आजोबा आणि पक्षाचे संस्थापक आणि माजी मुख्यमंत्री शेख मोहम्मद अब्दुल्ला यांच्या जयंतीदिनी ५ डिसेंबर रोजी सरकारने २०२५ च्या २८ राजपत्रित सुट्ट्यांची यादी जाहीर केली आहे.

इतकेच नव्हे तर १३ जुलै ला 'हुतात्मा दिन' म्हणून राजपत्रित सुट्टी देण्यात आलेली नाही. नॅशनल कॉन्फरन्सने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात १३ जुलै रोजी राजपत्रित सुट्टी बहाल करण्याचे आश्वासन दिले होते. पक्षाचे संस्थापक आणि जम्मू-काश्मीरचे माजी पंतप्रधान आणि मुख्यमंत्री शेख मोहम्मद अब्दुल्ला यांच्या जयंतीदिनी ५ डिसेंबर रोजी सुट्टी बहाल करण्याचा संकल्पही पक्षाने केला होता.

Selected

दिल्लीत १० हजार मतदार वाढले

नवी दिल्ली : माझ्या नवी दिल्ली या विधानसभा मतदारसंघात तब्बल १०,००० नवे मतदार वाढले असून सुमारे ५,००० मतदारांची नावे वगळली, असा आरोप आम आदमी पक्षाचे (आप) राष्ट्रीय निमंत्रक अरविंद केजरीवाल यांनी रविवारी केला. मतदार वाढणे व ते कमी होणे या बाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार केल्याचे त्यांनी सांगितले. दिल्लीत भाजपकडे मुख्यमंत्री पदाचा चेहरा नाही. तसेच मुख्यमंत्रीपदासाठी उमेदवारसुद्धा नाही, असा टोला केजरीवालांनी लगावला. दुसरीकडे, दिल्लीत आपकडून बांगलादेशी, रोहिंग्या मुस्लिमांची मतदार म्हणून नावनोंदणी सुरू आहे, असा जोरदार पलटवार भाजपचे प्रवक्ते मनजिंदर सिंग सिरसा यांनी केला. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर नव्या मतदारांची नावे नोंदवली जात असल्याच्या मुद्द्यावरून आप व भाजपमध्ये आरोप-प्रत्यारोपाची मालिका सुरू झाली आहे. आपचे प्रमुख तथा दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल म्हणाले की, आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीत बोगस मतदान करण्याचा भाजपचा इरादा आहे. मागील १५ दिवसांत नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघात १० हजार मतदार अचानक वाढले. ४ दिवसांत नवमतदारांचा आकडा हा १० हजारांच्या घरात पोहोचल्याचा आरोप केजरीवाल यांनी केला.

बेकायदा बांधकामे सुरू

लखनौ : समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाच्या खालीही शिवलिंग असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे राज्यातील सर्व धार्मिक स्थळांवर खोदकाम करण्याबरोबरच मुख्यमंत्र्यांचे निवासस्थानही खोदून शिवलिंग बाहेर काढण्यात यावे. राजभवनात बेकायदा बांधकामे सुरू असून, सरकार कोणतीही कारवाई करत नसल्याचा आरोप त्यांनी केला. सपा अध्यक्ष अखिलेश यादव यांनी मुख्यमंत्री योगी यांचे नाव न घेता, त्यांच्या हातात विकास नसून विनाशाच्या रेषा असल्याचे म्हटले आहे. ते उत्तर प्रदेशला कर्जबाजारी करून २०२७ मध्ये सरकारी तिजोरी रिकामी करतील, असा आरोप केला. महाकुंभाला स्वेच्छेने येण्याची परंपरा आहे. सरकार सर्व कामे बाजूला ठेवून महाकुंभाचे निमंत्रण वाटण्यात व्यस्त आहे अशी टीका त्यांनी केली. याशिवाय महाकुंभाची तयारी अपूर्ण असल्याचा आरोपही त्यांनी केला.

नागपूर की मिर्झापूर

नागपूर : बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे राज्यात कायद्या सुव्यवस्थेचा धाक उरला आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नागपूर शहरात गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारी वाढली आहे. मागील ५ दिवसांत ६ हत्याकांडाच्या घटना घडल्या आहेत. अशातच रविवारी आर्थिक वादातून २ भावांचा खून झाल्याचीची घटना घडली आहे. या घटनेमुळे नागपूर शहरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तहसील पोलीस ठाणे हद्दीतील गांधीबाग परिसरात काली माता मंदिर समोर रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली. रवी राठोड, दीपक राठोड असं मृत भावांचं नाव आहे. तर बदनसिंग राठोड, अभिषेक आणि सोनू राठोड अशी आरोपींची नावं आहे. आरोपी बापलेक आहेत. याशिवायही या प्रकरणी दोन आरोपी आहेत. मृतक रवी आणि दीपक हे सख्खे भाऊ आहेत. दोघांचाही मागील काही दिवसांपासून बदनसिंग सोबत वाद सुरू होते.

गायीच्या शेणाला विदेशात वाढती मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : भारतीय गायीच्या शेणाला परदेशात मोठी मागणी आहे. याबाबतचा एक अहवाल प्रसिद्ध झाला असून, त्यानुसार, २०२३-२४ या वर्षात भारतातून जवळपास १२५ कोटी रुपये किमतीचे निव्वळ शेण परदेशात निर्यात करण्यात आले.

शिवाय, गायीच्या शेणापासून बनवलेले १७३ कोटी रुपये किमतीचे खतही निर्यात झाले. गायीचे शेण असलेल्या कंपोस्ट खताचीही वर्षभरात ८८ कोटींची निर्यात झाली. एकुणात हे सर्व एकत्रित केल्यास तब्बल ३८६ कोटी रुपयांचे परकीय चलन भारतात शेणापासून उपलब्ध झाले. भारतीय गायीचे शेण हे शेतीसाठी संजीवनी ठरते, असे मानणारे शेतकरी परदेशातही ठिकठिकाणी आहेत. मृदा संवर्धनात गायीचे शेण हा कळीचा घटक ठरते, असे या शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे भारतीय गायीच्या शेणाला मागणी आहे.

'या' देशांतून शेण खरेदी

मालदीव, अमेरिका, सिंगापूर

चीन, नेपाळ, ब्राझील, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, कुवैत, संयुक्त अरब अमिरात.

रक्तरंजित संघर्ष

पंढरी संचार छायाचित्रसेवा



गाझा पट्टी : इस्रायल आणि हमास यांच्यातील रक्तरंजित संघर्ष सुरूच असून, गाझातील अल-वफा हॉस्पिटलवर इस्रायलने जोरदार हल्ला केला.

नितेश राणे यांच्या वक्तव्याने काँग्रेस संतप्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : केरळ राज्य हे मिनी पाकिस्तान आहे, त्यामुळेच राहुल गांधी आणि प्रियांका गांधी तिथून निवडून येतात, असे वादग्रस्त वक्तव्य मत्स्य आणि बंदरे विकाससंत्री नितेश राणे यांनी केले. त्यांच्या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात मोठा वादंग उभा राहिला असून काँग्रेस नेत्यांनी त्यांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त करीत त्यांना सुनावले आहे. तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे कारवाईची मागणी केली आहे.

केरळ सारख्या भारतातील एका प्रगत राज्याला मिनी पाकिस्तान बोलणे हे कितपत योग्य आहे? असा सवाल विचारून महायुतीचे मंत्री ज्या पदावर बसले आहेत, त्या पदाचा सन्मान राखायला शिकायला हवे. ही भाषा केवळ एका राज्याचा अपमान नसून भारताच्या एकात्मतेवरही हल्ला असल्याची टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी नितेश राणे यांच्यावर केली.

महायुतीच्या नेत्यांकडून वेळोवेळी अशी प्रक्षोभक वक्तव्ये केली जातात, जी समाजात द्वेष निर्माण करतात. जर केरळ "पाकिस्तान" असेल, तर केंद्र सरकार काय करत आहे? असा रोकडा सवाल उपस्थित करीत राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांना अतिरेकी मतदान करतात अशी मुक्ताफळे भाजपचे मंत्री उधळत आहे, हा मतदारांचा अपमान नाही का? असेही वडेट्टीवार यांनी विचारले.

गुंडगिरी आणि प्रक्षोभक भाषा वापरून दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या नेत्यांनाच आम्ही मंत्री बनवू, या पात्रतेवर महायुतीचे राज्यात मंत्रिमंडळ बनले आहे. त्यामुळे वेळोवेळी असे वक्तव्य करून आपली पात्रता सिद्ध करण्याची स्पर्धा महायुतीत लागलेली दिसत आहे, असे वडेट्टीवार म्हणाले. तसेच पात्रता सिद्ध करण्याच्या शर्यतीत आपली बुद्धी गमावलेल्या महायुतीच्या मंत्र्यांकडून महाराष्ट्रातील जनतेने कसली अपेक्षा न करणे योग्य, अशी उपसहात्मक टीकाही त्यांनी केली.

राहुल गांधी विदेश दौऱ्यावर; भाजपचा काँग्रेसवर हल्लाबोल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहण्यावरून भाजप आणि काँग्रेसमधील वाद थांबताना दिसत नाही. या प्रकरणी भाजपने राहुल गांधीयांच्यावर हल्ला बोल केला आहे. एकीकडे मनमोहन सिंग यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकाकुल आहे, असे भाजपने म्हटले आहे. तर दुसरीकडे राहुल गांधी नववर्ष साजरे करण्यासाठी व्हिएतनामला रवाना झाले आहेत. मनमोहन सिंग यांच्या अस्थी विसर्जनाला उपस्थित न राहिल्याबद्दल भाजपने काँग्रेस आणि गांधी कुटुंबावर टीका केली होती.

भाजपचे आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी एक्सवर एक पोस्ट टाकून राहुल गांधींवर पुन्हा हल्ला चढवला आहे. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनाने संपूर्ण देश दुःखी झाला आहे. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी नववर्षाच्या स्वागतासाठी व्हिएतनामला जाणार आहेत. माजी पंतप्रधानांच्या मृत्यूवरून राहुल गांधी राजकारण करत आहेत आणि त्याचा फायदा घेत आहेत, असा आरोपही मालवीय यांनी केला. गांधी परिवार आणि काँग्रेस शीखांचा तिरस्कार करते.

दरम्यान, काँग्रेसनेही भाजपच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधी खासगी दौऱ्यावर परदेशात गेले असून त्यात कुणालाही अडचण येऊ नये, असे काँग्रेसने म्हटले आहे. हा कोणाच्या तरी खासगीपणाचा विषय असल्याचे पक्षाने म्हटले आहे. राहुल गांधी खासगी प्रवास करत असतील तर तुम्हाला कशाला त्रास होतो? असा प्रश्न काँग्रेसने केला आहे.

आयटी एक्स्पर्टलाच ऑनलाईन गंडा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

बेंगळुरू : सर्वसामान्यांची ऑनलाईन फसवणूक ही काही नवी बाब राहिलेली नाही; पण बेंगळुरूमधील माहिती-तंत्रज्ञान तज्ज्ञाला लुबाडण्यातही सायबर भामटे यशस्वी ठरले आहेत. या टेक्निकल एक्स्पर्टचे १ कोटी ३ लाख रुपये लाटण्यात आले.

ऑनलाईन ट्रेडिंगमध्ये नफा कमावण्याच्या आमिषाला हा टेक्निकल एक्स्पर्ट बळी पडला. त्याला आधी ट्रेडिंगचे ऑनलाईन प्रशिक्षण दिले गेले. सुरुवातीला अल्प प्रमाणात नफा कमावण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. एक्स्पर्टही शेवटी माणूसच. त्याचा विश्वास बसला. नंतर मात्र त्याच्याकडून मोठी रक्कम लुबाडून हे सायबर भामटे गायब झाले. भामट्यांनी आपले हे इप्सित टेलिग्राम ग्रुपच्या माध्यमातून साध्य केले. हा ग्रुपही बनावट मोबाईल क्रमांकावर होता. मोठी रक्कम खात्यात येताच ग्रुपच डिलिट केला. टेक्निकल एक्स्पर्टच्या तक्रारीवरून पोलिसांनी माहिती-तंत्रज्ञान कायद्यांतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. सुरेंद्रकुमार दुबे असे ग्रुप ॲडमिनचे नाव होते. बिझनेस लीडर असे बिरुद त्याने नावापुढे लावलेले होते. ग्रुपमध्ये सुमारे ६० सदस्य होते. ग्रुप खरा आहे, हे भासवण्यासाठी सदस्यांच्या नफ्याचे स्क्रीनशॉट शेअर केले जात असत. हे सगळेच सदस्य कथित बिझनेस लीडर दुबेचे हस्तक होते.

तंत्रज्ञान तज्ज्ञाने ग्रुपवर देण्यात आलेल्या लिंकच्या माध्यमातून डिमॅट खाते उघडले. सुरुवातीला १० हजार रुपये गुंतवले. ही रक्कम ७ दिवसांत दुप्पट झाली. तपासून बघू म्हणून त्याने काही रुपये काढले, तेही त्याला मिळाले.

प्रकल्पा अंतर्गत २४३ किमी पेक्षा जास्त काम पूर्ण

बुलेट ट्रेनचे काम वेगाने सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून, त्याअंतर्गत १३ नद्यांवर आणि अनेक महामार्गावर पूल बांधले जात आहेत. अनेक रेल्वे रूळ सात स्टील आणि प्रीस्ट्रेस्ड काँक्रीट पुलांद्वारे ओलांडले जातील, अशी माहिती भारतीय रेल्वेने आपल्या वार्षिक आढाव्यात दिली आहे. या प्रकल्पांतर्गत २४३ किमीपेक्षा जास्त पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून, ३५२ किमीचे पिअर काम आणि ३६२ किमीचे पिअर फाऊंडेशनचे कामही पूर्ण झाले आहे.

गुजरातमध्ये ट्रॅक बांधण्याचे काम वेगाने सुरू आहे. आनंद, वडोदरा, सुरत आणि नवसारी जिल्ह्यात आरसी ट्रॅक बेडचे बांधकाम सुरू आहे. अंदाजे ७१ किमी आरसी ट्रॅक बेडचे बांधकाम पूर्ण झाले आहे आणि व्हायाडक्टवर रेल्वे वेल्डिंग सुरू झाले आहे, असे वार्षिक आढाव्यामध्ये म्हटले आहे. महाराष्ट्रातील मुंबई बुलेट ट्रेन स्टेशनसाठी पहिला काँक्रीट बेस स्लॅब ३२ मीटर खोलीवर यशस्वीरीत्या टाकण्यात आला असून तो १०

मजली इमारतीच्या समतुल्य आहे. वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स आणि शिळ फाटादरम्यान २१ किमी लांबीच्या बोगद्यावर काम सुरू आहे.

यामध्ये मुख्य बोगद्याचे बांधकाम सुलभ करण्यासाठी ३९४ मीटर इंटरमीडिएट बोगदा पूर्ण झाला आहे. पालघर जिल्ह्यात न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड वापरून सात बोगद्यांचे बांधकाम सुरू आहे. गुजरातमधील एकमेव माऊंटन बोगदा यापूर्वीच यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे. थीम-आधारित घटक आणि ऊर्जा-कार्यक्षम वैशिष्ट्यांसह डिझाइन केलेल्या या कॉरिडॉरवरील १२ स्थानके निमार्णाधीन असल्याचे पुनरावलोकनात म्हटले आहे.

ही वापरकर्ता अनुकूल आणि ऊर्जा-सकारात्मक स्थानके टिकाऊपणाला प्राधान्य ठेवून जागतिक दर्जाचा प्रवासी अनुभव देण्यासाठी डिझाइन केलेली आहेत. याशिवाय २०३० पर्यंत निव्वळ शून्य कार्बनचे लक्ष्य रेल्वेने ठेवले आहे. नोव्हेंबर २०२४ पर्यंत सुमारे ४८७ मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्प आणि सुमारे १०३ मेगावॉटचे पवन ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आल्याचे आढाव्यामध्ये म्हटले आहे. दरम्यान, १०३ किमी लांबीच्या व्हायाडक्टच्या दोन्ही बाजूंना २ लाखांहून अधिक ध्वनी अडथळे बसवून प्रकल्पाअंतर्गत एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे.

" ऋषभ पंतने जबाबदारी ओळखून खेळायला हवे. इतर कोणी सांगण्यापेक्षा त्याला स्वत:ला हे समजायला हवे. मान्य आहे यापूर्वी त्याने संघाला यश मिळवून दिले आहे. पण त्याने गोष्टी समजून घेऊन परिस्थितीनुसार खेळायला हवे." — रोहित शर्मा

चेंडूचा बॅट किंवा ग्लव्हजला स्पर्श झाल्याचा केवळ भ्रम असू शकत होता. यापूर्वीही असे झाले आहे. तंत्रज्ञानाचा यासाठीच वापर केला जात आहे. स्निको यासाठी आहे. जर तंत्रज्ञानाचा वापर करत आहात, तर त्यानुसारच निर्णय घ्या. — सुनिल गावस्कर

शेवटच्या सत्रात भारताने गमावल्या ७ विकेट्स

ऑस्ट्रेलियाचा विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मेलबर्न : ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाने मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर झालेल्या भारताविरूद्धच्या कसोटी मालिकेतील चौथ्या सामन्यात १८४ धावांनी रोमांचक विजय मिळवला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. याशिवाय ऑस्ट्रेलियाने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपच्या फायनलच्या दिशेनेही महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. त्याचबरोबर ऑस्ट्रेलिया मालिकेतील पराभवही टाळला आहे. आता सिडनीमध्ये होणाऱ्या अखेरच्या कसोटीत त्यांना मालिका विजयाची, तर भारताला मालिकेत बरोबरी करण्याची संधी असणार आहे.

बॉक्सिंग डे कसोटी असलेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारतासमोर शेवटच्या दिवशी ३४० धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताला ७९.१ षटकात १ बाद १५५ धावाच करता आल्या. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने हा सामना जिंकला. भारताने या सामन्यात शेवटच्या सत्रात ७ विकेट्स गमावल्या.

भारताने ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या डावात पाचव्या दिवसाच्या सुरुवातीला २३४ धावांवर सर्वबाद केले होते. पण ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावातील आघाडीमुळे भारतासमोर ३४० धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी भारताचा कर्णधार रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वाल उतरले. रोहित आणि जैस्वाल यांनी सुरुवात अगदी संयमी केली होती.

त्यांनी १६ षटकांपर्यंत एकही विकेट गामावली नव्हती. पण ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने टाकलेले १७ वे षटक महत्त्वाचे ठरले. त्याने या षटकात आधी रोहित शर्माला बाद केले. रोहितने ४० चेंडूत ९ धावा केल्या. याच षटकात कमिन्सने केएल राहुलला शून्यावर माघारी धाडले. तरी नंतर जैस्वालने विराट कोहलीच्या साथीने डाव पुढे नेला होता. मात्र २७ व्या षटकात विराटला ५ धावांवर मिचेल स्टार्कने स्लीपमध्ये उस्मान ख्वाजाच्या हातून झेलबाद केले. त्यामुळे भारताने लंचब्रेकपर्यंत या तीन विकेट्स गमावल्या होत्या.

मेन्स क्रिकेटर ऑफ द इयर

पुरस्कारासाठी भारतीय स्टार बुमराहला नामांकन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या कारकिर्दीत २०२४ हे वर्ष महत्त्वाचे ठरले आहे. बुमराहने या वर्षी अनेकवेळा विक्रमी कामगिरी केली. या वर्षात बुमराहने सर्वच फॉरमॅटमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. त्यामुळे जगभारातून निवडलेल्या ४ खेळाडूंमध्ये बुमराहचा समावेश करण्यात आला आहे. बुमराहसोबतच या पुरस्काराच्या शर्यतीत इतर तीन खेळाडू असणार आहेत. ज्यामध्ये जो रूट (इंग्लंड), ट्रॅव्हिस हेड, (ऑस्ट्रेलिया), हॅरी ब्रुक (इंग्लंड), या खेळाडूंचा समावेश आहे.

त्याचबरोबर आयसीसी मेन्स क्रिकेटर कसोटी क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्कारासाठी देखील बुमराहला नामांकन मिळाले आहे. त्यामुळे या पुरस्काराच्या शर्यतीत देखील आपल्याला बुमराह पाहायला मिळणार आहे. भारतीय गोलंदाजीचे नेतृत्व करणाऱ्या जसप्रीत बुमराहने या वर्षात एकूण ८ ट्वेंटी-२० सामने खेळले. ज्यामध्ये त्याने ८.२६ च्या सरासरीने व ४.१७ च्या एकॉनॉमीने १५ विकेट्स घेतल्या. बुमराहने २०२४ ट्वेंटी-२० वर्ल्ड कपमध्ये महत्त्वाची भूमीका बजावली.

त्याचबरोबर बुमराहने एकूण १३ कसोटी सामने खेळले. ज्यामध्ये त्याने १४.९२ च्या सरासरीने एकूण ७१ विकेट्स घेतल्या. बुमराहने मेलबर्न कसोटी सामन्यात १९.४२ च्या सरासरीने २०० कसोटी विकेट्सचा आकडा पूर्ण केला व तो सर्वात कमी सरासरीने विकेट्स घेणारा जगातील अव्वल गोलंदाज ठरला.

भारत-ऑस्ट्रेलिया मेलबर्न कसोटीसाठी लोटला जनसागर

मेलबर्न : मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर खेळला जात असलेला भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉक्सिंग डे कसोटी सामना अतिशय रोमांचकारी स्थितीत पोहोचला आहे. सामन्याच्या पाचव्या दिवशी खेळाडूंनी नव्हे तर स्टेडियममध्ये सामना पाहण्यासाठी आलेल्या चाहत्यांनीच सर्वांचे लक्ष वेधलं आहे. या सामन्याला चाहत्यांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावत ८७ वर्षांपूर्वीचा जुना विक्रम मोडला आहे. बॉक्सिंग डे कसोटी सामन्यात यजमानांनी पाचव्या दिवशी भारतीय संघाला विजयासाठी ३४० धावांचे लक्ष्य दिले आहे. बॉक्सिंग डे कसोटी सामना पाहण्यासाठी ऑस्ट्रेलियातील चाहत्यांनी एमसीजी स्टेडियममध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. ज्यामुळे चाहत्यांच्या उपस्थितीचा नवा विक्रम नोंदवला गेला आहे. यावेळी हा सामना पाहण्यासाठी एकूण पाच दिवसांच्या खेळासह एकूण प्रेक्षक संख्या ३,५०,७०० पेक्षा जास्त राहिला. आतापर्यंत या मैदानावर इतके प्रेक्षक कधीच आले नव्हते जेवढे हा सामना पाहण्यासाठी आले आहेत.

रोहित-विराट कसोटीतून निवृत्ती घेणार ? शास्त्रींचे उत्तर

मेलबर्न : विराट कोहलीवर सर्व जबाबदारी होती पण तोही काही विशेष करू शकला नाही आणि मिचेल स्टार्कचा बळी ठरला. कोहलीला केवळ पाच धावा करता आल्या आणि ३३ धावांच्या स्कोअरवर भारताला तिसरा धक्का बसला. यानंतर विराट कोहली खेळत राहील, पण रोहित शर्माला आता मोठा निर्णय घ्यावा लागेल, असा विश्वास रवी शास्त्री यांनी व्यक्त केला. रवी शास्त्री यांनी रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या निवृत्तीच्या चर्चेवर मेलबर्न कसोटीतील पाचव्या दिवसाच्या पहिल्या सत्रानंतर वक्तव्य करत म्हणाले, "माझ्या मते विराट कोहली आणखी काही काळ खेळताना दिसेल. तो आज कसा बाद झाला, याने काही फरक पडत नाही. माझ्या मते तो पुढील तीन-चार वर्षे खेळताना दिसेल. रोहित शर्मा बद्दल बोलायचं तर, तो निर्णय घेऊ शकतो. टॉप ऑर्डरमध्ये त्याचं फूटवर्क आता पूर्वीसारखे राहिलेलं नाही. चेंडूपर्यंत पोहोचण्यात त्याला विलंब होतोय. त्यामुळे या मालिकेत काय करायचं हा सर्वस्वी त्याचा निर्णय असणार आहे."

अनुष्का शर्मचीची मॅच विनिंग खेळी; जिंकली ट्रॉफी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : सिनियर वूमेन्स वन-डे ट्रॉफी स्पर्धेत बंगालविरूद्धच्या अंतिम सामन्यात अनुष्का शर्माने अर्धशतकी खेळी करत मध्य प्रदेशच्या पारड्यात विजय खेचून आणला. बंगालने प्रथम फलंदाजी करत मध्य प्रदेशला विजयासाठी १३७ धावांचे आव्हान दिले. मध्य प्रदेशने ३४.४ षटकात लक्ष्याचा यशस्वी पाठलाग केला. ज्यामध्ये अनुष्का शर्मा (६९) व आयुषी शर्माने (३०) धावांची नाबाद खेळी करत सामना ७ विकेट्सने जिंकला. मध्य प्रदेशने पहिल्यांदाच सिनियर वूमेन्स वन-डे ट्रॉफीवर आपले नाव कोरले.

नाणेफेक जिंकून मध्य प्रदेशने घेतलेला प्रथम गोलंदाजीचा निर्णय योग्य ठरला. राजकोटमधील निरजन शाह मैदानावर बंगालचे विकेट झटपट गेले. अवघ्या ५ धावांवर बंगालला पहिला धक्का बसला. सलामीवीर धारा गुजार शून्यावर बाद झाली. त्यानंतर चौथ्या षटकांत १६ धावांवर बंगालचे मागोमाग दोन फलंदाज माघारी परतले. टी सरकार २१ धावांवर बाद झाला आणि बंगालला चौथा धक्का.

५ व्या क्रमांकावरील मिता पौल व सहावी फलंदाज पी बाला यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण मिताने २५ धावांचे योगदान दिले. मिता झेलबाद झाल्यानंतर बंगालचा डाव पुन्हा घसरला. दुसऱ्या बाजूने बाला टीकून खेळत होती, पण तिला ४२ धावांवर माघारी परतावे लागले आणि बंगालच्या खेळीला १३६ धावांवर फूल स्टॉप लागला.

क्रिकेट स्पर्धेत क्रिशु नाईट्सचा अंतिम फेरीत प्रवेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : क्रिककिंगडम यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या क्रिककिंगडम चॅम्पियन्स करंडक १६ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत क्रिशु नाईट्स संघाने आपली विजयी मालिका कायम ठेवत चौथ्या विजयासह अंतिम फेरीत प्रवेश केला.

शापूर्जी पालोनजी मैदान व वीरांगना क्रिकेट मैदान या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत तरुण एस (२-७ व नाबाद ५५) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर क्रिशू नाईटस संघाने डीपीएस डायनामोज संघाचा १० गडी राखून दणदणीत विजय मिळवत आगेकूच केली.

दुसऱ्या लढतीत आयुश कुमार(३-२५) याने केलेल्या गोलंदाजीच्या जोरावर क्रिककिंगडम युनायटेड संघाने ओडीएम ब्लास्टर्स भुवनेश्वर संघाचा ५४ धावांनी पराभव केला.

अनप्रिडीक्टेबल इलेव्हन संघाला विजेतेपद !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : 'एमएआर लीग' अजिंक्यपद करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यामध्ये निशांत बाबर याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर अनप्रिडीक्टेबल इलेव्हनने ग्रीनपार्क क्लबचा २ धावांनी पराभव करून स्पर्धेचे विजेतेपद संपादन केले.

लोहगांव येथील रन-३६० टर्फ मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यामध्ये पहिल्यांदा फलंदाजी करताना अनप्रिडीक्टेबल इलेव्हनने ९३ धावांचे आव्हान उभे केले होते. निशांत बाबर याने सर्वाधिक नाबाद ३७ धावांची खेळी केली. त्याला रवि सिंग (१७ धावा) आणि गौरव पलहेरकर (१४ धावा) यांनी दुसऱ्या बाजुने योग्य साथ दिली. प्रथम खांडवे याने अचूक गोलंदाजी करताना ८ धावांमध्ये ३ गडी टिपले. या लक्ष्याचा पाठलाग करताना ग्रीनपार्क क्लबने ९१ धावांची मजल मारली. राज राठोड याने ४३ धावांची तर, अभि केदारी याने नाबाद २३ धावांची खेळी केली. पण तरीही अंतिम विजेतेपद ग्रीनपार्क संघापासून केवळ दोन धावांनी दुर राहीले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण स्पर्धेचे संचालक अजय नायर, सुमित बिजलानी, अवरजीत नहा आणि ओम पाटील यांच्या हस्ते करण् यात आले. विजेत्या अनप्रिडीक्टेबल संघ आणि उपविजेत्या ग्रीनपार्क संघाला करंडक आणि मेडल्स् देण्यात आली.

न्यूझीलंडने श्रीलंकेवर ४५ धावांनी मिळवला विजय

माउंट मौनगानुई : दुसऱ्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडने श्रीलंकेचा ४५ धावांनी पराभव केला. नाणेफेक हरल्यानंतर फलंदाजीला आलेल्या किवी संघाने ५ विकेट गमावत १८६ धावा केल्या. माऊंट मौनगानुई येथे सामनावीर मिचेल हेने १९ चेंडूत नाबाद ४१ धावा केल्या. प्रत्युत्तरात सोमवारी श्रीलंकेचा संघ १९.१ षटकांत १४१ धावांवरच रोखला गेला. संघाने शेवटच्या ५ विकेट ६ धावांत गमावल्या. कुसल परेराने सर्वाधिक ४८ धावा केल्या. न्यूझीलंडकडून जेकब डफीने १५ धावांत ४ बळी घेतले. संघाने मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. न्यूझीलंडची पहिली विकेट १३ धावांवर पडली. रचिन रवींद्र १ धावांवर हसरंगाच्या गोलंदाजीवर बाद झाला. यानंतर चॅम्पमन आणि रॉबिन्सन यांनी दुसऱ्या विकेटसाठी ४१ चेंडूत ६९ धावांची भागीदारी केली. मार्क चॅम्पमनने २९ चेंडूत ४२ आणि टीम रॉबिन्सनने ३४ चेंडूत ४१ धावा केल्या.

जैस्वाल, आकाश दीपच्या विकेटनंतर चाहते आक्रमक

मेलबर्न : मेलबर्न कसोटी सामना भारताने गमावला. पण या सामन्यात थर्ड अंपायरकडून भारतीय संघाच्या विरोधात दोन धक्कादायक निर्णय पाहायला मिळाले. यशस्वी जैस्वालच्या विकेटची तपासणी करताना तिसऱ्या पंचांकडून स्निको मिटर्सचा वापरच करण्यात आला नाही. पंचानी निर्णय देण्यात घाई केली आणि भारतीय चाहते प्रचंड संतापले. त्यानंतर मेलबर्न स्टेडियममध्ये चीटर चीटरचा नारा घुमला. झालं असं की ७१ व्या षटकात यशस्वी जैस्वाल पॅट कमिन्सच्या गोलंदाजीचा सामना करत होता. कमिन्सने षटकातील पाचवा चेंडू जैस्वालला बॉसर टाकला आणि जैस्वाल तो चेंडू पूल करायला गेला. पण चेंडू बॅटच्या संपर्कात न आल्यामुळे थेट यष्टीरक्षक ॲलेक्स कॅरीच्या हाताता गेला. यावर ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी अपिल केल्यानंतर पचांकडून नॉट आऊट देण्यात आले. पण ऑस्ट्रेलियाने रिव्ह्यू घेतला. त्यानंर तिसऱ्या पंचांनी स्निको मिटरने पडताळणी न करता थेट जैस्वालला बाद घोषित केले. त्यानंतर स्निको मिटरने चेक केले असता स्निकोवर अल्ट्रा एज दिसली नाही.

कै. सागर डोमसे प्रौढ करंडक टी-२० क्रिकेट स्पर्धेत शंतनू शुटर्स संघाला विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : कै.ला.सागर डोमसे यांच्या स्मृती प्रित्यर्थ लायन्स क्लब ऑफ पुणे रहाटणी यांच्या वतीने आयोजित कै. सागर डोमसे प्रौढ(४०वर्षांवरील) करंडक टी -२०क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत विशाल बारणे ८० धावांच्या खेळीच्या जोरावर शंतनु शुटर्स संघाने गार्गी एज्यूकॉन संघाचा ६ गडी राखून पराभव करत विजेतेपद संपादन केले. फोर स्टार मैदान हिंजवडी या मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत प्रथम फलंदाजी करताना प्रशांत खराडे ५७, सौरभ रावलिया ६५, प्रफुल्ल मानकर नाबाद ३४ यांनी केलेल्या धावांच्या जोरावर गार्गी एज्यूकॉन संघाने २०षटकात २बाद १९०धावा केल्या.

हे आव्हान शंतनु शुटर्स संघाने १९.१षटकात ४बाद १९३धावा करून पूर्ण केले.

यात विशाल बारणे ८०, संतोष पुणेकर ५६, संदीप पाटोळे २४, संतोष कुमार सांगळे नाबाद १७यांनी धावा काढून संघाला विजय मिळवून दिला. तिसऱ्या व चौथ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत सचिन थोपटे(नाबाद ३१ व ३-१६) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर लवास संघाने मेव्हरिक्स लिजेंडस संघाचा ७ गडी राखून पराभव करून तिसरा क्रमांक पटकावला.

स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण डिस्ट्रिक्ट गव्हर्नर एमजेएफ लायन विजय सारडा, व्हाइस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर १ एमजेएफ लायन राकेश अगरवाल, व्हाइस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर २ एमजेएफ लायन श्रेयस दिक्षित यांच्या हस्ते करण्यात आले.

आधी सिक्सर मारला, मग क्रिझवर कोसळला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : क्रिकेट खेळताना किंवा व्यायाम करत असताना तरुणांमध्ये हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. अनेकदा अशाप्रकारच्या घटना समोर आलेल्या आहेत. आताही जालना जिल्ह्यात असाच एक धक्कादायक प्रकार घडला असून या घटनेचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.

जालना शहरात आयोजित क्रिकेट स्पर्धेत एका फलंदाजाचा खेळत असताना क्रिझवरच हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे. ३२ वर्षीय खेळाडू जागीच कोसळल्याचे सदर व्हिडीओमध्ये दिसत असून तरुणांच्या आरोग्याबाबतचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

हाती आलेल्या माहितीनुसार, जालना शहरातील फ्रेजर बॉईजच्या मैदानावर ख्रिसमस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विजय पटेल बॅटिंग करत होता. त्याने सिक्सर मारल्यानंतर मधल्या वेळात तो सहकारी फलदांज अजय कसबेशी बातचीत करत होता. तेवढ्यात तो जमिनीवर कोसळला. यावेळी त्याला पाहण्यासाठी इतर खेळाडूंनी धाव घेतल्याचे दिसून येते. विजय पटेलचा सहकारी खेळाडू अजय कसबेने एबीपी माझाशी बोलताना सांगितले की, आम्ही दोघे बॅटिंग करत होतो.

वेडगे ॲकॅडमी, रायझिंग क्रिकेट क्लब संघांची विजयी सलामी !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे क्रिकेट ॲकॅडमी आणि सागर कांबळे यांच्यावतीने कै. अभिषेक ठाकूर यांच्या स्मरणार्थ आयोजित 'अभिषेक ठाकूर करंडक' आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्वेन्टी-२० क्रिकेट २०२४-२५ स्पर्धेत वेडगे ॲकॅडमी आणि रायझिंग क्रिकेट क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत सिद्धांत जोशी याने केलेल्या नाबाद ६८ धावांच्या जोरावर वेडगे ॲकॅडमीने २२ यार्डर्स ॲकॅडमीचा ७ गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या २२ यार्डर्स ॲकॅडमीने १३३ धावा धावफलकावर लावल्या. यामध्ये यश माने याने नाबाद ४७ धावांची तर, अमित पवार याने ३२ धावांची खेळी केली. वेडगे ॲकॅडमीने हे लक्ष्य १४.५ षटकात व ३ गडी गमावून पूर्ण केले. सिद्धांत जोशी याने नाबाद ६८ धावांची तर, पंकज लालगुडे याने नाबाद ४६ धावांची खेळी केली. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ६२ चेंडूत १०७ धावांची नाबाद भागिदारी करून संघाचा विजय साकार केला.

सुदीप धरणगांवकर याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर रायझिंग क्रिकेट क्लबने स्केलअप ॲकॅडमीचा ८ गडी राखून सहज पराभव केल. पहिल्यांदा खेळणाऱ्या स्केलअप ॲकॅडमीचा डाव ९३ धावांवर आटोपला.

१४ वर्षाखालील मुलांली क्रिकेट स्पर्धा !

पृथ्वी क्रिकेट ॲकॅडमीला विजेतेपद !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : कमोडोर एल.एस. मेहता यांच्या स्मरणार्थ आयोजित 'गुरू विजय दळवी करंडक' १४ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ षटकांच्या क्रिकेट २०२४ स्पर्धेत स्वराज मोरे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे पृथ्वी क्रिकेट ॲकॅडमीने वैभव क्रिकेट ॲकॅडमीचा ३६ धावांनी पराभव करून स्पर्धेचे विजेतेपद संपादन केले.

धानोरी येथील डी.एन.परांडे स्पोर्ट्स हब मैदानावर झालेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यामध्ये पहिल्यांदा खेळताना पृथ्वी क्रिकेट ॲकॅडमीने २५ षटकामध्ये १७८ धावांचे लक्ष्य उभे केले. शौर्य कोंडे याने ४१ धावांची तर, पृथ्वीराज खांडवे याने ३१ धावांची खेळी केली. या दोघा सलामीवीरांनी ७४ चेंडूत ६७ धावांची सलामी देताना संघाला चांगली सुरूवात करून दिली. यानंतर मधल्याफळीतील फलंदाज सर्वेश आर. याने ३९ धावा आणि स्वराज मोरे याने ३३ धावांचे योगदान देत संघाला १७८ धावांचे लक्ष्य उभे करून दिले.

या आव्हानाला उत्तर देताना वैभव क्रिकेट ॲकॅडमीचा डाव २५ षटकामध्ये १४२ धावांवर मर्यादित राहीला. वीरन पाटील याने ४५ चेंडूत ९ चौकार आणि एका षटकारासह ५१ धावांची खेळी केली. याशिवाय आर्यन ताकवणे याने ३१ धावांचे योगदान दिले. स्वराज मोरे याने १७ धावांमध्ये ३ गडी बाद करून अचूक गोलंदाजी केली आणि संघाच्या विजयामध्ये अष्टपैलु योगदान दिले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे सर्वोच्च परिषदेचे सदस्य सुशील शेवाळे, माजी रणजीपटू प्रभाकर मोरे, पराग मोरे, चेतन थोरात, निशा मेहता यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे संचालक मोहसीन तांबोळी, समीर पटेल आदि मान्यवर उपस्थित होते. विजेत्या पृथ्वी ॲकॅडमी आणि उपविजेत्या वैभव ॲकॅडमीला करंडक आणि मेडल्स् देण्यात आले.